कृषीवल
रायगड, शुक्रवार दि. २० जानेवारी, २०२३
किंमत ४ ₹

फासात अडकून बिबट्याचा मृत्यू

। आगरदांडा । वार्ताहर । भालगाव परिसरातील जंगल भागात एक चार वर्षाचा व ४५ किलो वजनाचा बिबट्याचा रानटी डुकरांसाठी लावण्यात येणाऱ्या फासात अडकून मृत्यू झाला आहे. एक बिबट्या फासात अडकल्याची माहिती प्रादेशिक वन विभागास मिळताच सर्व वरिष्ठ वनाधिकारी या ठिकाणी पोहचून त्याला वाचवण्याचा प्रयत्न करू लागले. या साठी पशुवैद्यकीय अधिकारी याना सुद्धा पाचारण करण्यात आले होते. परंतु सर्व यंत्रणा पोहचेपर्यंत बिबट्याचा मृत्यू झाला होता. •> पान २ वर

'मविआमुळे महाराष्ट्राचे नुकसान'

। मुंबई । प्रतिनिधी । महाविकास आघाडी सरकारच्या काळात डबल इंजिन सरकार नव्हतं त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्राचं नुकसान झाले,अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. मोदी यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि करण्यात आलं. त्या कार्यक्रमात विविध मुद्द्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. मविआ सरकारच्या काळात विविध योजना आणि प्रकल्प यांच्यात अडथळे निर्माण करण्याचं काम झालं. आता मात्र विकासाला पुन्हा गती आली आहे,असेही मोदी यांनी यावेळी सांगितले.

महामार्गावर मृत्यूचा घाला- दहा ठार

। माणगाव । प्रतिनिधी ।
मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून माणगावजवळ रेपोली गावच्या हद्दीत गुरुवारी (१९ जानेवारी) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास ट्रकची इको कारला समोरासमोर धडक लागून झालेल्या भीषण अपघातात कारमधील एकाच कुटुंबातील दहाजण ठार झाले. हे सर्व प्रवासी मुंबईहून आपल्या आजीच्या उत्तरकार्यासाठी गुहागर तालुक्यातील हेदवी येथे निघालेले असतानाच त्यांच्यावरती काळाने घाला घातला. या अपघातामुळे महामार्गावर रक्ताचा सडा पसरला होता. या दुर्घटनेत नऊ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर एका चार वर्षाच्या बालकाला माणगाव उपजिल्हा रुग्णालय येथून अधिक उपचाराकरिता मुंबई येथे घेऊन जात असताना वाटेतच पाली गावाजवळ त्याचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका बालकाचा,४ महिलांचा व ५ पुरुषांचा समावेश आहे.

गुहागर तालुक्यात असलेल्या हेदवी गावात आजीचे उत्तर कार्य असल्याने मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या जाधव कुटुंबातील सदस्य बुधवारी मुंबईत एकत्र येऊन रात्री १० वाजणेच्या सुमारास (एमएम ४८ बीटी ८६७३) या क्रमांकाच्या इकोकारने गुहागरकडे जाण्यासाठी निघाले होते. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ही कार रेपोली गावाजवळ आली असता त्याच वेळेस मुंबई बाजूकडे विरूद्ध बाजूने (एमएच ४३ जी ७११९) या क्रमांकाचा ट्रकसमोर आल्याने दोन्ही वाहनांची समोरासमोर ठोकर झाली आणि एकाच कुटुंबातील १० जणांना प्राण गमवावे लागले.

अपघाताचे वृत्त समजताच गोरेगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्रीकृष्ण नावले यांच्यासह, प्रदीप घोडके, सुग्रीव मुंडे, नितीन रसाळ, श्रीराम मोरे, सुनील गोळे, सायली सानप, यशवंत चव्हाण, श्रीकृष्ण पाटील, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद काकतकर आदींसह टेमपाले येथील मजीद लोखंडे, पोलीस पाटील समीर मुरूडकर लोणेरे सिध्देश टेंबे या ग्रामस्थांनी अपघातस्थळी धाव घेऊन मदत कार्य सुरू केले.

या अपघाताची माहिती मिळाल्यावर माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्यासह अनेक माणगावकरांनी सकाळी लवकर उपजिल्हा रुग्णालयात धाव घेऊन अपघाताची माहिती घेतली. या अपघाताची नोंद •> पान २ वर

कणकवलीत बसला अपघात

कणकवली : वागदे पुलानजीक खासगी बसला भीषण अपघात झाला. पहाटे चार वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात चौघाजणांचा मृत्यू झाला तर चौघांचा मृत्यू, २१ जण जखमी झाले आहेत. चालकाचं नियंत्रण बसवरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

त्या कोवळ्या जीवाचा संघर्ष अर्ध्यावाटेत संपला.....

या अपघातानंतर मदत कार्यासाठी पोहचलेल्या पोलिसांसह मदतकर्त्यांना इको गाडीत अडकलेल्या अवस्थेत मात्र हलक्या आवाजात रडणारा चार वर्षांचा भव्य दिसला. चक्काचूर झालेल्या कारमधून त्याला बाहेर काढण्याचे आव्हान समोर असताना चारही बाजूने शर्थीचे प्रयत्न करत भव्य याला अपघातग्रस्त कारमधून बाहेर काढण्यात आले. तातडीने त्याला उपचारासाठी माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारा नंतर त्याला मुंबईतील रूग्णालयात दाखल करणे गरजेचे असल्याने लगेचच पुढील प्रवास सुरू झाला या प्रवासात तो इवलासा जीव मरणासोबत संघर्ष करत होता. मात्र रूग्णवाहिका अर्ध्या रस्त्यात गेली आणि एक दिर्घ श्वास घेऊन 'भव्य' चा संघर्ष इथेच संपला.

अपघातातील मृतांची नावे

कारमधील अमोल रामचंद्र जाधव (वय-४०)चालक निलेश चंद्रकांत पंडित (वय-४५), दिनेश रघुनाथ जाधव (वय-३०) सर्व हेदवी ता.गुहागर, निशांत शशिकांत जाधव (वय-२३) रा.विरार, स्नेहा संतोष सावंत (वय-४५) रा.कलमबिष्ट ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग सध्या रा. जोगेश्वरी मुंबई, कांचन काशिनाथ शिर्के (वय-५८) रा.चिपळूण जि.रत्नागिरी सध्या रा.नवी मुंबई,दीपक यशवंत लाड (वय-६०) रा.कॉटन ग्रीन मुंबई, मुद्रा निलेश पंडित (वय-१२) रा.हेदवी ता.गुहागर जि.रत्नागिरी सध्या रा.मुंबई,नंदिनी निलेश पंडित (वय-४०) रा.हेदवी ता.गुहागर जि.रत्नागिरी सध्या रा.मुंबई या ९ जणांचा जागीच मृत्यू झाला तर भव्य निलेश पंडित (वय-४) रा.हेदवी ता.गुहागर जि.रत्नागिरी सध्या रा.मुंबई या बालकाला माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल केल्यावर अधिक उपचारासाठी मुंबई येथे घेऊन जात असताना वाटेतच पाली गावाजवळ त्याचा मृत्यू झाला.असे एकूण १० जणांचा या अपघातात मृत्यू झाला.

वे|ध|क

सत्यजीत तांबेंची काँग्रेसमधून हकालपट्टी

मुंबई : नाशिक पदवीधर मतदार संघातून अपक्ष उभे उसलेले सत्यजीत तांबे यांचीही काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. त्यानंतर मविआने नाशिकमध्ये शुभांगी पाटील आणि नागपूरमध्ये सुधाकर आडबालेंना पाठिंबा देण्याचे निश्चित झाले आहे, असे पटोले यांनी सांगितले.

अभिनेत्री राखी सावंतला अटक

मुंबई : अभिनेत्री राखी सावंतला मुंबईतील आंबोली पोलिसांनी अटक केली आहे. एका मॉडेलचा फोटो व्हायरल केल्याचा आरोप राखी सावंतवर करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तक्रारीची दखल घेत त्यावरून पोलिसांनी कारवाई केली आहे. या महिलेचा फोटो राखीनं व्हायरल केला होता. यासंदर्भात संबंधित मॉडेलनं पोलिसांत तक्रार दाखल केली होती. अभिनेत्री शरलीन चोप्रानं यासंदर्भात ट्विटरवर माहिती दिली आहे.

राजकीय चित्र बदलण्याची माझ्यात धमक : आ.जयंत पाटील

। महाड । ग्रामीण प्रतिनिधी ।

राज्यात व जिल्ह्यात काही चित्र बदलले आहेत ते राजकीय असो सामाजिक असो ते बदलण्याची व पुन्हा पूर्वीचे दिवस आणण्याची धमक आपल्यामध्ये असल्याचे प्रतिपादन शेकाप आम.जयंत पाटील यांनी महाडमध्ये केले. ते महाड येथील लोकविकास सामाजिक संस्थेच्या महाड महोत्सव समारोप प्रसंगी गुरुवारी बोलत होते. तर शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी मोठा महोत्सव भरवणे सोपे नसते त्यासाठी टीम वर्क महत्त्वपूर्ण असते, असे मत व्यक्त केले

यावेळी व्यासपीठावर लोकविकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष हनुमंत जगताप, अनिल नवगणे, किशोर धारिया, प्रशांत गुजर, दीपक वारंगे, दिलीप जैन, महाडचे माजी नगराध्यक्ष सुरेश मोरे, अमृतभाई पटेल, संजय परांजपे, एकनाथ गायकवाड, माजी नगरसेवक बंटी पोटफोडे आदी उपस्थित होते.

तर जयंत पाटील यांनी भाषणामध्ये विविध पैलूना हात घातला. महाड हे जगताप हे महाडचे भावी नेतृत्व आहे. तिचे वेगळेपण विकासकामातून दिसून येत आहे. भविष्यात तिला तन, मन, धनाने पुढे नेण्याची जबाबदारी आम्ही घेतली आहे, असेही ते म्हणाले.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून दोन लाखांचा निधी पुढील वर्षी देण्याची घोषणाही जयंत पाटील यांनी केली. या पुढे अलिबागपेक्षा जास्त लक्ष महाडकडे देणार असल्याचे वचन दिले. सहकार क्षेत्र जिवंत ठेवण्याचे काम माणिक जगताप यांनी ठेवले होते त्यानंतर नाना •> पान २ वर

महाड महोत्सवाची सांगता

नावीन्य, पराक्रम, विविधताचे शहर आहे. महाडमधील मतदार विचार पूर्वक मतदान करतात.माजी खा. शंकरराव सावंत यांचे नेतृत्व सामाजिक बांधिलकी असलेले नेते होते त्याचा हा वारसा आजही महाडमध्ये जपल्याचे पाहवयास मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी आम. माणिक जगताप गेले काँग्रेस संपली असे सर्वांना वाटले. मात्र ते नाना जगताप यांनी खोटे ठरवत काँग्रेस जिवंत ठेवली आहे. स्नेहल

काश्मिरी महिलांना अलिबागच्या समुद्राची भुरळ

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून काश्मिर प्रसिद्ध आहे. देश विदेशातून असंख्य पर्यटक काश्मिरला भेट देऊन नंदनवनाच्या सृष्टी सौंदर्याची लज्जत लुटत असतात. मात्र काश्मिरमध्ये लहानाचे मोठे झालेल्या काश्मिर खोऱ्यातील महिलांना मात्र अलिबागच्या विशाल समुद्रकिनाऱ्याची भुरळ पडली आहे. पुणे येथील असीम फाऊंडेशनने भारतीय सैन्याच्या साथीने जम्मू काश्मीर खोऱ्यामधील या गावातील महिलांच्या हाताला बेकरी उत्पादन निर्मितीचा रोजगार मिळवून दिला आहे. त्यानिमित्त पुण्यात आलेल्या या महिलांना फाऊंडेशनतर्फे काय पहायचे आहे असे विचारले असता त्यांनी समुद्र पहायचे आहे असे एका

दमात सांगून टाकले. त्यामुळे अलिबागमधील समुद्रावर त्यांना अलिबागला आणण्यात आले होते. समुद्राच्या पहिल्यांदाच घेतलेल्या दर्शनाने या महिलांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद झळकत होता. रायगडातील वातावरण, समुद्र, निसर्ग आणि भोजन आवडल्याचे या महिलांनी सांगितले.

महाराष्ट्रातील बेकरी पदार्थाची माहिती मिळावी आणि त्यातून आपल्या बेकरी व्यवसायात नवे पदार्थ •> पान २ वर

माणगावमध्ये संगनमताने हत्या

। माणगाव । प्रतिनिधी ।

संगनमत करून एकाची हत्या केल्याप्रकरणी दोन आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची घटना बुधवारी (१८ जानेवारी)दरम्यान विळे आदिवासीवाडी गावच्या हद्दीत विळे हायस्कूल समोरील शेतामध्ये घडली.

याबाबतची फिर्याद श्रीधर दगडू मगर (वय-३४) रा.तासगाव ता.माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. सयाजी धोंडू पवार रा.सणसवाडी ता.माणगाव व आरोपी मुकेश पुतळाजी नलावडे(मुका),गणेश बाबुराव नलावडे दोन्ही रा.सणसवाडी ता.माणगाव हे शेकोटी शेकत होते. त्यांच्यात झालेल्या भांडणाचा मनात राग धरून गुरुवारी दि.१८ जानेवारी रोजी रात्री सयाजी धोंडू पवार व आरोपी हे मौजे विळे आदिवासीवाडी येथून दारू पिऊन घरी येत असताना विळे हायस्कूलसमोरील शेतामध्ये आले. सयाजी धोंडू पवार यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने मुकेश पुतळाजी नलावडे व गणेश बाबुराव नलावडे यांनी संगनमत करून हाताबुक्याने व हत्याराने मारहाण करून जखमी केले. या मारहाणीमुळे सयाजी मयत झाले.

'अपघातांनी असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त'

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

माणगावजवळ गुरुवारी पहाटे घडलेल्या अपघाताने आख्खे कुटुंबच उद्धवस्त झाले असून, राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत आहे.त्यामुळेच अशा भयंकर घटना घडत आहेत, यामुळे राज्यकर्त्यांविषयी कोकण वासियांच्या मनात तीव्र संताप निर्माण झाल्याची असल्याची टीका शेकाप नेते, माजी आम.पंडित पाटील यांनी केली आहे.

माणगावनजीक झालेली दुर्घटना अतिशय दुर्दैवी आणि हृदयद्रावक अशी आहे. असे अनेक अपघात आतापर्यंत या महामार्गावर झालेले असून,असंख्य कुटुंबे अशी उद्ध्वस्त झाली असल्याबद्दल पंडित पाटील यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. वास्तविक कोकणाला जोडणारा हा महामार्ग वेळेत पूर्ण करण्यात आतापर्यंतच्या सर्वच राज्यकर्त्यांना अपयश आलेले आहे. मुख्यमंत्री शिंदे हे दावोसमध्ये जाऊन आंतरराष्ट्रीय उद्योगांशी चर्चा करतात. पण त्याच राज्यकर्त्यांना कोकणातील रस्ते करायला सुचत नाही हे आपले दुर्दैव म्हटले पाहिजे.सरकारने प्रकल्प आणावेत, पण ते आणताना आधी •> पान २ वर

वावोशी दांडवाडी राजिप शाळेच्या शिक्षकाची फरफट

वीटभट्टीवरील मुलांना गोळा करू की शिकवू?

। वावोशी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील वावोशी ग्रामपंचायत हद्दीतील दुर्गम भागात असणाऱ्या दांडवाडी आदिवासी येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी भारत आढे या एकाच शिक्षकावर खालापूर गटशिक्षणाधिकाऱ्यांनी टाकली आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना वीटभट्टीवर जाऊन जमवाजमव करून आणायचे की त्यांना शिकवावे, अशी दुहेरी कसरत करण्याची वेळ या शिक्षकावर आली आहे.

वावोशी दांडवाडी येथील काही आदिवासी हे रोजगारासाठी आजूबाजूच्या गावामधील वीटभट्ट्यांवर स्थलांतरित •> पान २ वर

वावोशी दांडवाडी शाळेला दोन शिक्षकांची गरज असतानादेखील एक शिक्षक दुसऱ्या शाळेवर पाठवला आहे. त्यामुळे एकाच शिक्षकावर चार वर्गांचा भार पडत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी दोन शिक्षक असावेत, अशी आमची प्रशासनाकडे मागणी आहे.
- रामा वाघमारे, पालक, वावोशी दांडवाडी

मातृछत्र गमावलेल्या बालकाला जीवदान

। नेरळ । प्रतिनिधी ।

आईच्या दुधाला पारखं झालेल्या एका चार महिन्याच्या बालकावर यशस्वी उपचार करुन त्याचे वजन वाढविण्यात आरोग्य यंत्रणेला यश आले आहे. कर्जत तालुक्यातील डामसेवाडी येथील चार महिन्याच्या बाळाच्या आई डिसेंबर २०२२ मध्ये मृत झाल्यानंतर त्या बालकाची अंगावरील दुधापासून आबाळ झाली होती. त्यानंतर त्या कुपोषित बाळाला एकात्मिक बालविकास आणि युनायटेड वे या संस्थेकडून कर्जत उपजिल्हा रुग्णलयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान,मागील १५ दिवसात त्या कुपोषित बालकाच्या प्रकृतीत सुधारणा होत असून त्या बालकाचे वजन दुप्पट झाले असून ते आता कुपोषणाच्या नॉर्मल स्टेजमध्ये आले आहे.

जगदीश आवाटे यांच्या पत्नी सरिता यांचे निधन झाले. त्याआधी त्यांनी जन्म दिलेल्या बाळाला स्वतःच्या अंगावरील दूध पाजू शकली नाही. त्याचा

परिणाम त्या बालकाची शारीरिक वाढ वेळेवर होऊ

पंधरा दिवसात वजन दुप्पट

शकली नाही. त्यामुळे त्या बालकाचे वजन वयानुसार वाढायला हवे होते ते देखील वाढले नाही. कुपोषणाच्या खाईत गेलेल्या त्या बाळाला शोधून उपचार करण्यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्प आणि युनायटेड वें या संस्थेने यांनी त्या बाळाला कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. दोन जानेवारी रोजी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले त्यावेळी त्या बाळाचे वजन हे एक किलो ८०० ग्रॅम एवढे होते. एकात्मिक बाळविकास प्रकल्प अधिकारी अनिकेत पालकर आणि पर्यवेक्षिका शरयू तांबे यांनी त्या बाळाची जबाबदारी कर्जत उपजिल्हा रुग्णालय यांच्यावर सोडली होती.

बालरोग तज्ञ डॉ मनोज बनसोडे यांनी उपचार सुरु केले. त्यासाठी त्यांनी रुग्णालयातील डायटिशन सचिन धनगर तसेच स्टाफ नर्स सपना गायकवाड आणि रुपाली कांबळे या आरोग्य पथकाच्या जोडीला ताई जगताप आणि सुलभा शेलार या परिचारिका तसेच बाळाचे वजन वाढावे यासाठी औषधे यांच्या जोडीला योग्य आहार देण्यासाठी आचारी रुपाली खंडागळे यांनी देखील आपली जबाबदारी पार पडली आणि त्यामुळे १५ दिवसात त्या कुपोषित बाळाचे वजन दुप्पट झाले आहे. दोन जानेवारी रोजी त्या कुपोषित बालकाचे वजन हे एक किलो ८०० ग्रॅम एवढे होते. ते आता दोन किलो ६०० ग्रॅम म्हणजे दुप्पट झाले असून ते ब्लॅक देखील अतितीव्र कुपोषित श्रेणीमधून बाहेर आले आहे. त्या कुपोषित बालकाचे वजन वाढले असून कर्जत उपजिल्हा रुग्णालयात एनआरसी मध्ये उपचार घेत असल्याने प्रकृती देखील स्थिर झाली आहे.

त्यामुळे एकात्मिक बालविकास आणि कुपोषण निर्मूलनासाठी मदत करणारी युनायटेड वे यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.

जाहीर नोटीस

अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात

श्री. विजय हरी वैद्य ... अपिलार्थी

विरुद्ध

श्रीम. तारामती हरिश्चंद्र ठाकूर ... उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात आरटीएस अपिल क्र. ३५/२०२२ दाखल केले आहे.

अ. क्र.	गावाचे नाव	ग.नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
१	मौजे चौल, ता. अलिबाग	१०६४ (जुना स.नं. २५९/३ब)	०-३७-९० पो.ख. ०-०१-४० ०-३९-३०	१९.६२

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थींचे नाव : १) श्रीम. तारामती हरिश्चंद्र ठाकूर, २) श्री. मधुकर हरिश्चंद्र ठाकूर, ३) श्री. सुधाकर हरिश्चंद्र ठाकूर, ४) श्रीम. सुनिता विष्णू म्हात्रे, ५) श्रीम. अंजली कृष्णा ठाकूर, ६) श्री. सतिश कृष्णा ठाकूर, ७) श्री. संतोष दत्तात्रेय ठाकूर, ८) श्रीम. कविता संदीप घरत, ९) श्रीम. रुपाली रत्नाकर नाईक, १०) श्रीम. हेमांगी हेमंत नाईक, ११) श्रीम. श्वेता शेखर बेडेकर सर्व रा.मु.पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि. ०६-०२-२०२३ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(प्रशांत ढगे)
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

अंनिसची कार्यकारिणी पनवेलमध्ये

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची राज्य कार्यकारिणीची बैठक प्रथमच पनवेलमध्ये होत आहे. पनवेल शहरातील आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात होणाऱ्या दोन दिवसाच्या बैठकीच्या निमित्ताने अंनिसच्या पनवेल शाखेच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

कला प्रदर्शन २१ व २२ जाने रोजी आगरी समाज मंडळाच्या महात्मा जोतिबा फुले सभागृहात तळमजल्यावर असेल. प्रदर्शनाचे सकाळी ९ वाजता जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का ताई महाजन यांच्या हस्ते होणार आहे.

सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी मोफत खुले असेल. तसेच पनवेलमधील सर्व हितचिंतक समविचारी लोकांचा स्नेह मेळावा आयोजित केला आहे. पनवेलमधील सर्व हितचिंतक स्नेहींनी उपस्थित राहण्याचे आवाहन अंनिसकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी सिद्धेश ९८७०९११९११ व नाजूका ८९७६८७१३८१ यावर संपर्क साधावा.

चौकशीचे समन्स

कोरेगाव भीमा हिंसाचार प्रकरणी वरिष्ठ पोलिस अधिकारी विश्वास नांगरे पाटील, सुवेझ हक आणि डॉ. शिवाजी पवार यांची चौकशी होणार आहे. कोरेगाव भीमा हिंसाचार प्रकरणात स्थापन करण्यात आलेल्या चौकशी आयोगाने त्यांना याबाबत नोटीस बजावली आहे. २१ ते २५ जानेवारी दरम्यान या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांची साक्ष नोंदवली जाणार आहे.

लक्ष्मी धोपट यांचे निधन

कापोली : श्रीवर्धन तालुक्यातील वेळास गावाचे शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश भिकू धोपट यांच्या मातोश्री लक्ष्मी भिकू धोपट (वय ९०) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी व उत्तर कार्य बारावा रविवारी (२२ जानेवारी) सकाळी दहा ते दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास पार पडणार आहे.

पार्वती कवळे यांना देवाज्ञा

अलिबाग : नवगावचे उपसरपंच निखिल कवळे यांच्या आजी श्रीमती पार्वती शंकर कवळे(वय१०२) यांचे वार्धक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात ६ मुले,२ मुली,नातवंडे,पतवंडे असा मोठा परिवार आहे.दशक्रिया विधी २७ जानेवारी तर तेरावा २९ जानेवारीला होणार आहे.

लक्ष्मी पारंगे यांचे निधन

अलिबाग : महाजने, ता.अलिबाग येथील श्रीमती लक्ष्मी गजानन पारंगे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले,सुना,तीन मुली,जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे. रुखवतासाठी कलाकृती तयार करण्याचे छंद त्यानी जोपासला होता.भजन,कीर्तनाहीची त्यांना आवड होती. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पारंगे परिवाराचे सांत्वन केले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक,संपादककिंवामालकयांच्यावरराहणारनाही,याचीकृपयावाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

पान १ वरून

राजकीय चित्र बदलण्याची धमक माझ्यात : आ.जयंत पाटील

जगताप यांनी ठेवले मात्र इतर तालुक्यात सहकार दिसत नाही. एकनिष्ठता लोकपावत चालली आहे समाजात व राजकारणात संघाचा विचार संपत चालला असून काँग्रेसी बनत चालला असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी या वेळी केला या वेळी बोलताना चित्रालेखा पाटील यांनी स्व माणिकराव जगताप यांची आठवण येत असल्याचे आवर्जून नमूद केले. कोरोनाना आमचा माणिक हिरवला असे भावनिक उदगार काढत लोकविकास सामाजिक संस्था दत्तक घ्यावी भावना व्यक्त केली. अनिल नवगणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी विविध नागरिकांचे सत्कार करण्यात आले.यामध्ये रक्तदाते शरद गांगल,वारकरी संप्रदाय वरंध,मुक्ती रफी पुरकर,सर्पमित्र विशाल झुजरे,जमियतें उल्लेमा संघटना ,अंजुमन दाभोळ , आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार सन्मान करण्यात आला सूत्रसंचालन सुधीर शेठ यांनी केले

महामार्गावर मृत्यूचा घाला

गोरेगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास गोरेगाव पोलीस करीत आहेत. या अपघात प्रकरणी गोरेगाव पोलीसांनी ट्रक चालक अमृत शंकर खेतरी याला अटक केली असून त्याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शिवाय त्या ट्रकची फिटनेस मुदतही संपुष्टात आलेली आहे.

अधिकाऱ्यांकडून पहाणी..

अपघातानंतर रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तातडीने अपघात स्थळी भेट देऊन दोन्ही वाहनांची तसेच महामार्गावरील धोकादायक वळणांची पहाणी करत पोलीस अधिकाऱ्यांना काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या अपघाताची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य कारवाई करण्यात येईल तसेच यापुढे अपघात टाळण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न करण्याकरिता पुढाकार घेतला जाईल अशी प्रतिक्रिया त्यांनी माध्यमांजवळ बोलताना दिली.

कंत्राटदारांची बेपर्वाई

माणगाव ते लोणेरे हा महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम बऱ्यापैकी पूर्ण होत आले आहे मात्र काही ठिकाणी फ्लायओव्हर आणि दुभाजक ची कामे सुरू असल्याने रस्त्यावरील वाहतूक डायव्हर्ट करण्यात आली आहे असे असताना कुठेही वाहतूक डायव्हर्ट केल्याचे फलक किंवा दिशादर्शक फलक लावले नसल्याने वाहन चालविताना नेमकं कोणत्या मार्गाने जायचे आहे हेच लक्षात येत नसल्याने अनेक छोटे अपघात झाले आहेत वारंवार तक्रार आणि सुचना करूनही कोणीच दखल घेत नसल्याने परिस्थिती जैसे थे अशीच आहे हा अपघात देखील फलक नसल्याने ट्रक विरूद्ध दिशेने आला व दहा निष्पापांचा काळ ठरला त्यामुळे महामार्ग व्यवस्थेचा हा निष्काळजी पणा अपघातास जबाबदार असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

गुन्हा दाखल करा - ठाकूर

मुंबई गोवा हायवेवर झालेल्या अपघातानंतर यास जबाबदार असलेल्या राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागातील अधिकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी अभियंता आणि ह्या रस्त्याचे काम करणारे ठेकेदार यांच्यावर सदोष मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी पळस्पा इंदापूर राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण प्रकल्पग्रस्त कृती समितीच्या वतीने समन्वयक संतोष ठाकूर यांनी केली आहे. याबाबत त्यांनी रायगडचे पोलीस अधीक्षक यांचेकडे लेखी पत्र देत सदर मागणी केली असून याबाबत त्यांच्यावर मोबाईल द्वारे बोलणं झालं असून मेलद्वारे सदरचे पत्र पाठविण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

असंख्य कुटुंबे उद्ध्वस्थ

रस्त्यांची निर्मिती करावी अशी मागणीही त्यांनी केली.

काशिदमध्येही गेल्या आठवड्यात घडलेल्या दुर्घटनेचा उल्लेख करुन सरकारने याबाबत ठोस उपाययोजना शोधून नाहक जाणारे प्राण वाचवावेत,अशी मागणीही त्यांनी केली आहे.

बिबट्याचा मृत्यू

फणसाड अभयारण्य परिसरात अनेक बिबटे असून या मधीलच एक बिबट्या भक्ष्य शोधण्याच्या नादात तो फासात अडकला आहे.

दुचाकी गाडयांना वापरण्यात येणारी वायर या फासासाठी वापरण्यात आली होती. फासात अडकल्यावर अधिक हालचाल केल्याने सदरचा फास अधिक आवळला गेला. यामध्ये बिबट्याच्या कंबरेखालील भाग मोठ्या प्रमाणात अडकला गेला.परंतु वाचवणारी यंत्रणा पोहचून सुद्धा सदरील बिबट्या दगावला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर अक्षय सांगळे यांनी मृत बिबट्याचे शवविच्छेदन करून आपला अहवाल वनाधिकारी याना दिला आहे.बिबट्याच्या मुर्त्युमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

वन्यजीव प्रेमी संदीप घरत यांनी सांगितले की घटनास्थळी मी पस्थित होतो.वास्तविक पहाता घटना घडताच तातडीने आम्हाला फोन करणे आवश्यक होते. वनविभागाकडे याप्रकारच्या बचावकार्यासाठी आवश्यक यंत्रणा आणि प्रशिक्षणाचा अभाव असल्याचे ह्यातून अधोरेखित होते. अशा प्रसंगी वन्यप्राणी बचावकार्य करण्यात कार्यरत आणि निष्णात संस्था वा स्वयंसेवी मंडळींची मदत घेणे अतिशय महत्वाचे आहे, तसे केले असता सदर बिबट्याचा जीव नक्कीच वाचवता आला असता.असे ते म्हणाले.

मुलांना गोळा करू की शिकवू?

झाले असून, त्यांची मुलेदेखील त्यांच्यासोबत त्या ठिकाणी राहात आहेत. त्या मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता या मुलांना शाळेत नेण्यासाठी शिक्षकांना रोजच २ ते ३ किलोमीटर अशी कसरत करावी लागत आहे. यामध्ये शिक्षकांचा बराचसा वेळ विद्यार्थ्यांची जमवाजमव करण्यातच जातो. तसेच ही शाळा दुर्गम व डोंगराळ भागात वसली असल्याने येथील शिक्षकांना पायी डोंगर चढून वर जावे लागते. त्यामुळे हे शिक्षक शाळेत पोहोचेपर्यंत या शाळेतील विद्यार्थ्यांवर लक्ष द्यायला कुणीच नसते. त्यामुळे काही विद्यार्थी नुसतेच बसून असतात, तर काही विद्यार्थी शिक्षक येईपर्यंत कंटाळून जाऊन परत घरीदेखील जातात. तर काही मुलांचा अभ्यासही बुडतो. यामध्ये शिक्षकांना पुन्हा या विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून त्यांना शिकवायचे काम करावे लागते. अशातच या शाळेत १ली ते ४ थी असे चार वर्ग असल्याने या चारही वर्गाच्या मुलांना शिकवण्याची जबाबदारी फक्त भारत आढे या एकाच शिक्षकावर येऊन पडली असल्याने त्यांची पूर्णतः दमछाक होऊन जाते. त्यामुळे या ठिकाणी किमान दोन शिक्षक असणे गरजेचे आहे. सदर परिस्थितीची माहिती खालापूर पंचायत समितीचे शिक्षण विभागाचे अधिकारी यांना वेळोवेळी देऊनदेखील या शाळेवर आधीच्या मूळ शिक्षकाची नेमणूक करण्यात आलेली नाही.

त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून या ठिकाणी याआधी असणाऱ्या मूळ शिक्षकाची लवकरात लवकर नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पालकांकडून केली जात आहे.

अलिबागची भूरळ

निर्मिती करण्याच्या उद्देशाने पुण्यातील असीम फाऊंडेशन जम्मू काश्मीर मधील २० जणींना पुणे, अलिबाग दोऱ्यावर आणले होते. जम्मू काश्मीर हा बर्फाळ प्रदेश असल्याने या महिलाना समुद्राचे मोठे आकर्षण होते. अलिबागचा समुद्र पाहून सर्वच महिलाना आनंद झाला होता. अलिबाग विश्रामगृह येथे माहिती देण्याबाबत असीम फाऊंडेशन तर्फे पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी जम्मू काश्मीर मधील महिलांशी संवाद साधण्यात आला. असीम फाऊंडेशन चे प्रशांत घारे, हेमांगी भाटे यांनी त्याच्या कार्याविषयी माहिती दिली. त्यानंतर या महिलांनी अलिबाग मधील प्रसिद्ध मयूर बेकरीला भेट दिली. असीम फाऊंडेशन तर्फे सीमाभागातील महिलाना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी काम करीत आहेत. जम्मू काश्मीर खोऱ्यातील सांबा नौशेरा, पुंज, लाम, बग्गा, कुपवारा या भागातील महिलाना बेकरी उत्पादन रोजगार सुरू करून दिला आहे. त्यामुळे पूर्वी हाताला काम नसल्याने त्याचा वेळ फुकट जात होता. मात्र आता आमच्या हाताला काम मिळाल्याने कमाई पण होत आहे आणि समाधानही मिळत असल्याचे पुंछ मधील रिंपी देवी हिने सांगितले. जम्मू काश्मीरमधील महिलाना बेकरी काढून देण्यात आली असून सफरचंद, अक्रोडपासून विविध पदार्थ बनविले जातात. या महिलांच्या बेकरी पदार्थांना पुणेसह राज्यात मोठी मागणी असल्याने फाऊंडेशनतर्फे ते विकले जात आहेत. भारतीय सैनिकांनाही या बेकरी मधून पदार्थ विकले जात आहेत. त्यामुळे या महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. खोऱ्यातील सांबा नौशेरा या गावातील प्रकाशशो देवी, विणा देवी या महिलेसह सहा महिलांचे पती भारतीय सैन्य दलात देशाचे रक्षण करीत होते. आठ ही महिलांच्या पतीना वीरमरण प्राप्त झाले आहे. त्यामुळे पुढील आयुष्य कसे जगावे हा प्रश्न त्याच्या समोर उभा होता. अशातच असीम फाऊंडेशनच्या मदतीने आठ महिलाना एकत्रित करून वीरनारी बेकरी सुरू केली आहे. बेकरी व्यवसायातून आठही विर पत्नी आपल्या रु पायावर उभ्या राहिल्या आहेत.

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० जानेवारी

१)श्री.गजानन कावळे
मु.नवगाव
२०-०१-१९३७

२)श्रीम.अर्चना म्हात्रे
चेंढरे, अलिबाग
२०-०१-१९५१

३)श्रीम.विमल झेमसे
अलिबाग
२०-०१-१९४१

४)श्री.विष्णु पाटील
श्रीबाग-२, अलिबाग
२०-०१-१९४५ ००

जाहीर नोटीस

माझे अशिल भगवान खंडू गुरव यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली जमीन मिळकत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक अरविंद श्रीकृष्ण भोळे यांच्याकडून खरेदीखताने कायमस्वरुपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन : मौजे-लाडिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
३३	३/१	००-०५-१६	५१.६०

वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाच्या अगर संस्थेच्या साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजून माझे अशिल व्यवहार पूर्ण करतील. मागून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १९/१/२०२३

ॲड. सोनाली गजानन नाकते
पत्ता :- ऑफिस क्र. ०१, प्रसाद झेरॉक्सजवळ,
कर्जत कोर्ट रोड, ता. कर्जत, जि. रायगड
मो.:- ७५१७६०७६५५
ईमेल :- sonalinakate35@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वेश्वी सर्वे नं.१८ हिस्सा नं.२अ प्लॉट नं.१८ या मिळकतीवर बांधलेल्या उत्कर्षा उर्वशी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या वेश्वी अलिबाग या सोसायटीच्या इमारतीमधील तळ मजल्यातील सदनिका क्र.०१, क्षेत्र ६८७ चौ.फूट (वेश्वी ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ३५१/१) या निवासी सदनिकाचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री.महेश अरूण कोतवाल रा.वरसोली बापदेव आळी ता.अलिबाग जि.रायगड यांजकडून माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले आहे. सदर सदनिका मिळकतीचा विक्री व्यवहाराचा बयाणापावती विद्यमान मालक व माझे अशिलांमध्ये स्वाक्षरीत होवून व्यवहार झालेला आहे. संदर्भित सदनिका मिळकत ही पुर्णतः निर्वेध बोजाविरहित व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकाचे विद्यमान मालक यांनी माझे अशिलांना दिलेला आहे. या उपरही सदर सदनिका मिळकतीमध्ये अन्य कोणाचेही, कसल्याही तऱ्हेचे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच बयाणापावती, गहाण, दान, बक्षीस, करार, साठेकरार, अभिहस्तांकन झालेले असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या कालावधीत कागदोपत्री पुराव्यासह लेखी खालील पत्त्यावर कळविण्यांत यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही तोंडी/लेखी हरकत न आल्यास माझे अशिल व विद्यमान मालक वर नमूद सदनिका मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण:अलिबाग
दिनांक : १९/०१/२०२३

सदनिका मिळकतीची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास हरकत नाही

ॲड.जयेंद्र गुंजाळ
जिल्हा न्यायालय अलिबाग

सही/-
श्री.महेश अरूण कोतवाल

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

मुख्य कार्यालय 'मुंबै बँक भवन' २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट मुंबई-४०० ००१

मुख्यालय फोन नं. ०२२-२२६१७१५४ ते ५९

Email : recovery@mumbaidistrictbank.com

Website : www.mumbaidistrictbank.com

स्थावर व जंगम मिळकत जाहीर लिलाव विक्री

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ ला अधीन राहून)

जा.क्र.मुंबै बँक/कर्ज वसुली विभाग/फा-स्केअर फिशरीज/२०२२-२३/११४९५ दिनांक : २०/०१/२०२३

ज्याअर्थी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कार्यालय 'मुंबई बँक भवन', २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१. यांनी नमूद केलेल्या थकबाकीविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळविला असून त्यांचेवर रितसर मागणी नोटीस व जप्ती नोटीस बजावली आहे. तरी त्यांनी त्यांचेकडील येणेबाकी भरत नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारास अधीन राहून मी श्री.बी.एन. गायकवाड, विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमूद केलेली मालमत्ता लिलावाने खालील तारखेस, ठिकाणी, वेळी विक्री करण्याचे जाहीर करीत आहे.

कर्जदार :- मे. स्केअर फिशरीज प्रा.लि. कंपनी व इतर, ओम निवास, रुम नं. १०, सर्वोदय नगर जे.एम.रोड, भांडुप (प.) मुंबई- ४०० ०७८

वसुली दाखला क्रमांक :- जा.क्र.स.नि./क्र. १०१/प्र.क्र./७४०/११/२०१३, दि. २८/०१/२०१४ रु. ५,६८,५०,४१६/- यावर दि. २८/११/२०१३ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज, वसुली खर्च व इतर

मालमत्तेचे वर्णन :- मु.पो. भालगाव, ता. रोहा, जि. रायगड येथील गट नं. ७६ मधील स्थावर/जंगम मालमत्ता

लिलाव विक्रीच्या मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे.

कर्जदार/जामीनदार/ मिळकतदार नाव व पत्ता	मिळकतीचा तपशील	राखीव किंमत रुपये	इसारा रक्कम रुपये
मे. स्केअर फिशरीज प्रा.लि. कंपनी ओम निवास, रुम नं. १० सर्वोदय नगर, जे.एम.रोड, भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८	मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. (स्केअर फिशरीज प्रा.लि. कंपनी) मु.पो. भालगाव ता. रोहा, जिल्हा- रायगड पिन- ४०२ १०९, गट नं-७६ क्षेत्र ८.०९ हेक्टर आर जमीन	रु.५,४२,०३,०००/- (अक्षरी रुपये पाच कोटी बेचाळीस लाख तीन हजार मात्र)	रु. १०,००,०००/- (अक्षरी दहा लाख मात्र)

लिलावाचे ठिकाण :- मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कार्यालय, कर्ज वसुली विभाग, 'मुंबई बँक भवन', २०७, डॉ.डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.

लिलावाची तारीख :- मंगळवार, दिनांक ३०/०१/२०२३

लिलावाची वेळ :- सकाळी ११.०० वाजता

टिप :-

१. लिलावाच्या अटी, शर्ती व निविदा अर्ज बँकेच्या मुख्य कार्यालयातील कर्ज वसुली विभागात दि. २१/०१/२०२३ पासून दि. २५/०१/२०२३ पर्यंत (दुसरा, चौथा शनिवार, रविवार व कार्यालयीन सुट्ट्या वगळून) कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत मिळतील.
२. लिलाव विक्रीच्या मालमत्तेची पाहणी दि. २३/०१/२०२३ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत करता येईल.
३. सिलबंद निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. २७/०१/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.
४. लिलाव रद्द अगर तहकूब करण्याचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी राखून ठेवत आहेत.
५. या लिलावाद्वारे मिळकतीचे विक्री झाली नाही तर शासनमान्य किमतीला या स्थावर/जंगम मालमत्तेची विक्री करण्याचा अथवा लिलाव करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.
६. टेंडर फॉर्म व अटी, शर्ती फॉर्म करीता रु. १०००/- शुल्क परत न देण्याच्या अटीवर आकारण्यात येईल.

सदरची जाहीर नोटीस
आज दि. २०/०१/२०२३ रोजी
सही व शिक्क्यासहित प्रसिद्ध
करण्यात येत आहे.

सील

बी.एन. गायकवाड
(विशेष वसुली व विक्री अधिकारी)
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

नमुना क्र.७५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड

चौकशीची जाहिर नोटीस जा.क्र/१४१/२०२३/न्यायशाखा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि.रायगड

चौकशी अर्ज क्रमांक :- १५९/२०२३ दि.१९/०१/२०२३

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमाक :- 'श्री.हनुमान मंदिर चॅरिटेबल ट्रस्ट कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड'

श्री.सुरेश मुरलीधर ठाकूर ....अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे नमूद केलेल्या फेरफार अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्दयांवर चौकशी करणार आहेत.

(१) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन)

अ.क्र.	वस्तूचे नांव	नग	दर	अंदाजे किंमत रूपये पैसे
१	घंटा	१	४००	४००
२	मृदुंग	१	१२००	१२००
३	समई	१	३००	३००
४	टाळ	१०	२००	२०००
५	ताट	२५	१६०	४०००
६	पाण्याचे ग्लास	२५	१५	३७५
७	खुर्ची	२५	२५०	६२५०
८	टेबल	१	१६००	१६००
		एकूण	४१२५	१६१२५

तसेच रोख रक्कम रू.८२०/- खजिनदार श्री.मुरलीधर शालिक ठाकूर यांच्या ताब्यात राहील.

ब) स्थावर मिळकत : (वर्णन) मिळकत क्रमांक-१४३२, सिमेंट पत्रा, विटा पत्रा, मु.कामोठे, लांबी ३०X३० क्षे.चौ.स्के. फुट ९००

श्री हनुमान मंदिराच्या चतुर्सिमा
१. पूर्वेस : खाडी
२. पश्चिमेस : खाडी
३. दक्षिणेस : खाडी
४. उत्तरेस : कामोठेगाव

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/१/२०२३ रोजी दिली.

सही/-
(श्रीमती.अंजली रमेश पिसाळ)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड.

नि व ड क

कोलाडला करिअर शिबीर

कोलाड : धर्माधिकारी महाविद्यालयात अंधेरी मुंबई येथील इंडियन एअरलाईन्स करिअर अकॅडमी तर्फे नोकरी संदर्भात हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रकाश सर्कले, डॉ. ए. डी.लवोका, अनुशा रावत, सानिका शिंदे, डॉ. सूर्यकांत आमलपुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.अनिरुद्ध मोरे, प्रा. नेहल प्रधान, डॉ. सतीश सावळे, प्रा. रेश्मा शेळके, प्रा. राधाकृष्णन, प्रा.दर्शना माळी आदी मान्यवर उपस्थित होते.

डान्स अकादमीचे संमेलन

माणगाव : काजल डान्स अकादमीचे स्नेहसंमेलन शनिवारी (दि. २१ जानेवारी) अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, ॲड. राजीव साबळे, संजय साबळे, रामनारायण मिश्रा, संतोष खडतर, आनंद यादव, देवेंद्र गायकवाड, अजित तारळेकर, डॉ. अजय मोरे, रमेश मोरे, शर्मिला सुर्वे, रिया उभारे आदी उपस्थित राहणार आहेत.

पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

पनवेल : मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाच्या विविध पदांवर बाळासाहेबांची शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रसाद सोनावणे, रोशन पवार,अर्जुन परदेशी, कल्पेश कुलकर्णी, अभिजीत साखरे, तौफिक बागवान यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या सर्वांना नियुक्तीपत्रे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आली. रुग्णांसाठी योग्य ती मदत करण्याचे सुतोवाच नूतन पदाधिकाऱ्यांनी केले.

गेट-वे च्या पायऱ्यांची दुरवस्था

कोर्लई : मुंबईच्या सागरी प्रवासात महत्वाचा दुवा असलेल्या गेट वे ऑफ इंडिया येथे प्रवासी लाँच, कॅटॅमरानमधून उतरण्यासाठी असलेल्या पायऱ्यांची भयानक अवस्था झाली आहे. याकडे संबंधित सागरी मंडळाचे दुर्लक्षाबाबत निषेध व्यक्त करीत पॅसेंजर ऑफ कोकण तर्फे सामाजिक कार्यकर्ते दिलीप जोग यांनी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. याबाबतचे निवेदनही मेरीटाईम बोर्डाला सादर करण्यात आले आहे.

भटक्या श्वानांचा छळ

पनवेल : कुत्री व तिच्या चार पिल्लांना प्लास्टिक पिशवीत भरून क्रूर वागणूक दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर, सेक्टर २० येथील मधुलिका शामशंकर सिंग हे कुत्र्यांना खाऊ पिऊ घालण्याचे काम करतात. मात्र याच सोसायटीमधील वसंत, प्रमोद, जयवंत, रितेश आणि सिक्युरिटी कर्मचारी यांनी कुत्र्यांच्या लहानपिल्लांना पकडून प्लास्टिक पिशवीत भरत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आले.

गावठाण विस्तारासाठी साकडं

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

उरणच्या मोरा कोळीवाडा ग्रामविकास समितीने गावठाण विस्तारासाठी जिल्हा प्रशासनाला साकडं घातले असून, याबाबत जिल्हाधिकारी रायगड यांना निवेदन देण्यात आले आहे.

मोरा कोळीवाडा मूळ गावठाण आणि विस्तारित गावठाण यांचे शेवटच्या घरापर्यंतचे सिम्मांकन करून मोरा गावाशेजारी समुद्रातील बंदर, बोटी पार्किंगच्या जागांचा सर्वे करून, घरांचे प्रॉपर्टी कार्ड, मोकळ्या जागा मासळी मार्केट, बंदर, मासे सुकवण्याच्या जागा यांचे सीमांकन करून लोकवर्गणी, लोकसहभागातून, मोरा गावठाण विस्तार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मोरा कोळीवाडा ग्रामविकास समितीचे निवेदन

सदरच्या निवेदनात मोरा कोळीवाड्याचे सीमांकन होणे ही सर्व नागरिकांची मागणी असून त्याबाबतीत जाहीर ठराव घेऊन करण्यात आला आहे.

आज नव्याने विकसित झालेले जेएनपीटी बंदर हे मोरा मच्छीमार बंदराच्या सागरी मच्छीमार क्षेत्रात उभारले आहे. त्यामुळे येथील मासेमारी आणि कोळीबांधव बाधित प्रकल्पग्रस्त आहेत. त्याचप्रमाणे शिवडी सी लिंक तसेच अनेक सीलिंक प्रकल्पामुळे तसेच नवी मुंबई महानगर पालिका, मुंबई महानगर पालिका, पनवेल महानगरपालिका यांचे प्रदूषित गटाराचे पाणी तसेच एमआयडीसींचे प्रदूषित रसायन मिश्रित पाणी यामुळे मासेमारी व्यवसाय बाधित आहे. यासाठी मोरा कोळीवाड्याच्या गावठणाचा सर्वे तसेच लोकसंख्या, घरे, बंदर याचा सामाजिक आघात सर्वे होणे गरजेचे आहे, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

लोकवर्गणी आणि लोकसहभागातून मूळ गावठाणाचे आणि विस्तारित गावठाणाचे खाजगी सर्वेअर कडून जाहीर मोजणी करण्याचा मोरा- कोळीवाडा ग्रामविकास समितीने निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायत अधिनियम अंतर्गत गावठाण विस्तार उपक्रमास शासकीय मान्यता आहे. म्हणून मोरा कोळीवाड्यास महसूल विभाग, मत्स्य आयुक्त, बंदर अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने यांची नोंद घेऊन त्यास सुरक्षा देण्याच्या संदर्भात मोरा कोळीवाडा ग्रामविकास समिती उरण या समितीचे अध्यक्ष प्रशांत दत्ताराम कोळी, हेमंत गोविंद कोळी उपाध्यक्ष, राकेश कोळी तसेच समितीचे कायदेविषयक सल्लागार व गावठाण विस्तार चळवळीचे नेते राजाराम पाटील यांनी रायगड जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

> **मोरा कोळीवाड्यामध्ये कोळीवाड्याचा सोशल इम्पॅक्ट सर्वे न करता जेट्टीचे अनधिकृत बांधकाम चालू आहे त्यामुळे मच्छिमारांचे मोरा बंदर उध्वस्त होऊन मच्छिमारांवर उपासमारीची पाळी येणार आहे; येत्या १५ दिवसात जिल्हाधिकारी यांनी सर्वे न केल्यास मच्छीमार जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहेत.**
> **– प्रशांत कोळी (अध्यक्ष ग्रामविकास समिती)**

> **मोरा कोळीवाडा सम्राट अशोकाकालीन आंतरराष्ट्रीय बंदर असून तेथे बौद्धकालीन लेणी सुद्धा आहेत. याचे पुरातत्वीय महत्व लक्षात न घेता रो –रो जेट्टीचे काम सुरु आहे. यामुळे कोळीवाड्यातील घरांना धोका संभवतो म्हणूनच मोरा कोळीवाड्याचा गावठाण विस्तार शासनाने मंजूर करणे गरजेचे आहे.**
> **– राजाराम पाटील (गावठाण विस्तार चळवळीचे नेते)**

शिक्षकांचे मुंबईत आंदोलन

रायगडातील गुरुजीही सहभागी

। पनवेल । वार्ताहर ।

राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका मधील शिक्षकांच्या विविध समस्यांकडे नगरविकास विभाग दुर्लक्ष करत असल्यामुळे महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाने शुक्रवारपासून छेडलेल्या एक दिवसीय लाक्षणिक उपोषणाला रायगड जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यातून नपा मनपातील शिक्षक सहभागी होत आहेत. दि.१९ रोजी हे शिक्षक मुंबई आझाद मैदानांवर आंदोलनासाठी रवाना झाले.

राज्यभरातील जवळपास पाच हजार शिक्षक या आंदोलनात सहभागी होणार आहेत. रायगड मधील या शिक्षक संघाचे पदाधिकारी वैभव पाटील, ज्योत्स्ना भरडा, प्रमोद लांगी यांच्यासह जिल्ह्यातील शेकडो शिक्षक या धरणे आंदोलनात सहभागी झाले आहेत. राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका शिक्षकांना शंभर वेतन मिळालाच पाहिजे, शिक्षकांना जुनी पेंशन लागू करावी, जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणे ऑनलाईन बदली पोर्टल सुरू करावे, नगरविकास विभागाने नगरपालिका व महानगरपालिका शिक्षकांसाठी स्वतंत्र शिक्षण विभाग स्थापन करावा, शहर पातळीवर केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यासारखी पदे निर्माण करून नपा व मनपाच्या शिक्षकांना पदोन्नती द्यावी आदी मागण्या या शिक्षक महासंघाने शासनाकडे केल्या आहेत. शिक्षकांच्या मागण्यांबाबत आम्ही यापुर्वी मुख्यमंत्री,प्रधानसचिव यांच्यासोबत पत्रव्यवहार केला आहे. मात्र आमच्या मागण्या विचारात घेतल्या जात नसल्याने दि.२० रोजीचे लक्षवेधी धरणे आंदोलन शासनाला जाग आणण्यासाठी छेडले असल्याची माहिती नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाचे अध्यक्ष अर्जुन कोळी यांनी दिली.

'राणीज गिफ्ट वेबसाईट'चे प्रकाशन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पीएनपी नाट्यगृह येथे पार पडलेल्या कृषीवल आयोजित हळदी कुंकू कार्यक्रमामध्ये राणीस गिफ्ट क्रिएशनची अधिकृत वेब साईट www.ranisgiftcreations.in चे अनावरण सोनी मराठी वाहिनीवरील अभिनेते व अभिनेत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

नांगरवाडीमध्ये राहणाऱ्या राणी रमेश धुमाळ हिने लॉकडाऊनमध्ये वस्तू तयार करण्यास सुरुवात केली. वाढत्या ऑनलाईन वापरामुळे सध्या जग हे ऑनलाइन झाले आहे. त्याचा विनियोग करुन तिने आपण तयार केलेल्या अनेक वस्तु ऑनलाईनद्वारे विक्रीसाठी उपलब्ध करुन दिल्या. आता पर्यंत राणीने भारताबाहेर आपले प्रोजेक्ट पाठवले आहेत. राणीच्या या स्तुत्य उपक्रमाचा कौतुक होत आहे महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी राणीचे या उतुंग भरारीचे कौतुक केले. www.ranisgiftcreations.in या संकेतस्थळावरुन वस्तु उपलब्ध होणार आहे. उपस्थित कलावंतांनीही राणीच्या या कलेचे कौतूक केले.

म्हसळा महाविद्यालयाचे उडान महोत्सवात यश

। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा येथील महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या उडान फ्लाईट ऑफ एक्सटेन्शन महोत्सवात तृतीय क्रमांकाचे बाजी मारली.

महाविद्यालयातील एकूण १२ विद्यार्थी व विद्यार्थिनी उडान महोत्सवातील चार विविध स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. सर्जनशील लेखन (क्रिएटिव्ह रायटिंग) या स्पर्धेत नाईक व अंतुले महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी उमामा हजवाने हिने तृतीय पारितोषिक मिळवले. उमामा हजवाने - वक्तृत्व व सर्जनशील लेखन, कु. पार्थ वेटकोळी व दीक्षा हेगिष्टे - पोस्टर मेकिंग व पथनाट्य, तसेच पथनाट्य स्पर्धेमध्ये मध्ये कु. विनीत जंगम, अस्फरअली समनाके, नीलम खोत, श्रुती जंगम,स्वप्निल दाभोळकर,मनिकेत मोरे, मोहम्मद कैफ फकजी, स्वरूप नाईक, क्षितिजा जाधव या विद्यार्थ्यांनी निसर्ग संवर्धन या विषयावर सादरीकरण केले.

युवा सप्ताह निमित्त अलिबागेत जनजागृती

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

राष्ट्रीय युवा दिन युवा सप्ताहाचे औचित्य साधून अलिबाग येथे जनजागृती करण्यात आली.

जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड अलिबाग यांच्या सहकार्याने प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या माध्यमातून क्षेत्रीय प्रचार अधिकारी केंद्रीय संचार ब्यूरो अहमदनगर फनीकुमार, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग बसस्थानक येथे ही जनजागृती करण्यात आली.

कलावंतांनी कलापथकातून व्यसनमुक्ती, बेटी बचाव बेटी पढाओ, शासनाच्या विविध

कल्याणकारी योजना, आरोग्य यांसह विविध विषयांवर जनजागृती केली.

या पथनाट्यात प्रिझम सामाजिक विकास संस्थेचे आठ कलाकार सहभागी झाले असून सदर कलापथकाचे नेतृत्व प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथील कर्मचारी व अलिबाग आगार येथील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास बहुसंख्य जनसमुदाय उपस्थित होता.

युवा सप्ताहानिमित्त म्हसळ्यात कार्यक्रम

। म्हसळा । वार्ताहर ।

स्वामी विवेकानंद सप्ताहानिमित्त म्हसळ्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथे संपन्न झालेल्या सप्ताहानिमित्त गेले आठवडाभर विविध कार्यक्रम सुरु असून कार्यक्रमांची पाचवी माळ गुंफण्याचा मान देण्यात आला.

या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. या दालनाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन समीर बनकर, प्राचार्य प्रकाश हाके, पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबू शिर्के, अशोक काते, महेश पवार, श्रीकांत बिरवाडकर, अरुण जंगम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अशोक काते, महेश पवार यांनीही मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रकाश हाके यांनी प्रास्ताविक केले. पाटील सर यांनी सूत्रसंचालन केले.

राज्यस्तरीय किल्ले बांधणी स्पर्धेत पारस पाटीलचा तृतीय क्रमांक

। पोयनाड । वार्ताहर ।

शिवसृष्टी पुणे संघटनेकडून किल्ला शिवरायांचा किल्ले बांधणी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचा नुकताच निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये चौथा खुला गटात पारस पाटील चौकीचापाडा याने तृतीय क्रमांक मिळवला आहे.

स्पर्धेसाठी पारस पाटीलने मुरूडजवळील समुद्रात असलेल्या पद्मदुर्ग किल्ल्याची

प्रतिकृती आपल्या घरासमोर दिवाळीत उभारली होती. पद्मदुर्ग किल्याची प्रतिकृती आकर्षक व सुंदर होती. पारसने त्याच्या आवाजात पद्मदुर्ग किल्ल्याचा इतिहास शब्दांकन केला होता. किल्ला पाहताना वा किल्ल्याची माहिती ऐकताना खरोखर पद्मदुर्ग किल्ला पाहत आहे असेच वाटते.पारसला किल्ले बांधणीसाठी स्वरा, आर्यन, ओवी, निशांत या चिमुकल्यांनी मदत केली.

पारस पोयनाड हायस्कूलमध्ये बारावी सायन्सचे शिक्षण घेतो. गतवर्षी दुर्गरक्षक सामाजिक संस्था अलिबाग संस्थेच्या किल्ले बांधणी स्पर्धेत सागरगड किल्ल्याची प्रतिकृतीला तृतीय क्रमांक मिळाला. राज्यस्तरीय किल्ले बांधणी स्पर्धेत पारसने मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पनवेलमध्ये सव्वा लाखांचा गुटखा जप्त

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पनवेल तालुका पोलिसांनी एक लाख ३८ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्रिमूर्ती पेट्रोल पंपाच्या बाजूला अजिवली, कोनगाव येथे एक इसम ऑटो रिक्षामध्ये गुटखा मालाचा साठा करून त्याची विक्री करण्याकरता येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी सापळा रचला पोलिसांनी रिक्षा स्पीड ब्रेकरवर स्लो झाली असता रिक्षाच्या समोर येऊन रिक्षा अडवली व रिक्षात बसलेल्या इसमाला ताब्यात घेतले. राहुल कल्पनाथ सिंग असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या गाडीत एक लाख ३८ हजार रुपयांचा स्वादिष्ट सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी गुटखा सापडून आला. जीसन नावाच्या व्यक्तीने हा गुटखा टेम्पोमध्ये आणून दिला असल्याचे त्यांनी सांगितले व त्याचा मालक रोहन रमेश मांडे (तळेगाव वाडी) यांच्या सांगण्यावरून हे केले असल्याचे सांगितले. या तिघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

'अनंत आठवणी' पुस्तकाचे प्रकाशन

। वाघ्रण । वार्ताहर ।

वाघ्रण येथील नाट्य अभिनेते सेवादल कार्यकर्ते निवृत प्राथमिक शिक्षक कै. अनंत जगू पाटील यांचे जीवनावर आधारीत विजय अनंत पाटील लिखित अनंत आठवणी या आतकथा पुस्तकाचे प्रकाशन जेष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ. मोहन पाटील, कवी चंदने, कवी संकेत म्हात्रे, तुलसीदास पवार, विजय पाटील, दिपक यशवंत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पुस्तकाला प्रस्तावना अरुण म्हात्रे यांची असून मुखपृष्ठ तरुण चित्रकार प्रथमेष म्हात्रे यांनी केले आहे. या प्रकाशन सोहळ्यात गायन आणि कवीता वाचन झाले तर व्यासपीठावर उपस्थितांस राजन पाटील, अनिल पाटील आदींची मनोगते झाली. कार्यक्रमास वाघ्रण गावांतील आणि मुंबईतील वाघ्रणकर यांच्या सोबत अनेक मित्र नातेवाईक उपस्थित होते.

हिराजी पाटील यांच्या जयंतीदिनी

बेल्जियम पर्यटकांचे हुतात्म्यांना अभिवादन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील मानिवली गावातील हुतात्मे हिराजी गोमाजी पाटील यांची जयंती निमित्त हुतात्मा स्मारक समितीच्या वतीने अभिवादन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या सोहळ्यात बेल्जियम देशातील पर्यटक म्हणून आलेले पाहिजे मार्टिंझ दाम्पत्य यांचे हस्ते हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

नेरळ येथील हुतात्मा स्मारक समिती यांच्या वतीने हुतात्मा चौक येथील स्मारक परिसरात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हुतात्मा चौक येथील हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पर्यटक म्हणून बेल्जियम देशातून माथेरान येथे जाण्यासाठी आलेले जोसेफ मार्टिंझ आणि मार्टिना मार्टिंझ यांना हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष संतोष पेरणे आणि समितीचे कार्यकर्ते

अरविंद कटारिया यांनी हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या कार्याबद्दल माहिती दिली आणि अभिवादन करण्यासाठी पाचारण केले. हुतात्मा चौकातील दोन्ही पुतळे हे फ्रीडम फायटर यांचे असल्याची माहिती मिळताच त्या मार्टिंझ दांपत्याने अभिवादन करण्यास तयारी दर्शविली.त्यानंतर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या १०९ व्या जयतीनिमित हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन केले. या दाम्पत्याने हुतात्म्यांच्या पुतळ्यांना अभिवादन केल्यानंतर स्मारक परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भित्तीचित्राची माहिती घेतली. त्यावेळी अरविंद कटारिया यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि ग्रेट मराठा लीडर असल्याची माहिती देताच बेल्जियम देशातील नागरिक जोसेफ मार्टिंझ यांनी आय नो शिवाजी महाराज असे सांगत त्या ठिकाणी वेगवेगळे प्रकारे छायाचित्र आपल्या कॅमेऱ्यात लयबध्द घेवून शिवाजी महाराज यांना देखील अभिवादन केले.

ग्रामपंचायतीकडून पुष्पहार

हुतात्मा चौक येथे हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळ्यांना नेरळ ग्रामपंचायतीकडून अभिवादन करण्यात आले. हुतात्मा हिराजी पाटील यांच्या जयंतीनिमित्त नेरळ ग्रामपंचायत सरपंच उषा पारधी यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यावेळी ग्रामपंचायत सदस्य उमा खडे, शिवाली पोतदार तसेच ग्रामपंचायतीचे मंगेश इरमाळी, प्रमोद बाचम, जगदीश डबरे, चंद्रकांत राठोड आदी उपस्थित होते.

जत्रेतली खेळणी

स्वित्झर्लंडमधील दावोसमध्ये दरवर्षी जगभरच्या श्रीमंतांची जत्रा भरत असते. भारतासारख्या गरीब देशांमधले राजकारणी, उद्योगपती आणि तमाम चमको लोक या जत्रेत जाऊन त्यांच्या भेटीगाठी घेतात. अब्जावधीच्या गुंतवणूक प्रकल्पांची चर्चा करतात. शेवटी एक सांमजस्य करार करतात. खरे तर याला आपल्या जमिनीच्या व्यवहारातल्या साठेखताइतकीही किंमत नसते. कारण, साठेखतात निदान थोडी इसारा रक्कम दिलेली असते. इथे तसे काहीच नसते. फक्त शाब्दिक बडबड कागदावर उतरवलेली असते. जत्रेतून आणलेली खेळणी दाखवत यावे तसे आपले नेते हे करार अभिमानाने दाखवतात. यंदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे झटपट दावोसला जाऊन एक लाख ३७ हजार कोटींचे करार करून आले आहेत. येण्याजाण्याच्या प्रवासात जेवढा वेळ गेला त्याहीपेक्षा कमी वेळ ते दावोसमध्ये असावेत. त्यांना नरेंद्र मोदींचा मुंबई-दौरा गाठायचा होता. अलिकडेच योगी आदित्यनाथ मुंबईत नुसता रोड शो करून पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक मिळाली, घेऊन गेले असे म्हणतात. त्या मानाने दावोसचा महागडा दौरा महाराष्ट्राला महागात गेला असे म्हणायला हवे. असो. पण, निदान खेळणी भरपूर जमा झाली आहेत, असा शिंदे यांचा दावा आहे. या करारांपैकी दहा हजार कोटींची गुंतवणूक मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या शहरांमध्ये होणार आहे. उरलेली एक लाख २७ हजार कोटींची गुंतवणूक कोणत्या क्षेत्रात आणि कोठे होणार आहे हा प्रश्नच आहे. आकडे तर बरेच दिले आहेत. उदाहरणार्थ उर्जा आणि इलेक्ट्रिकल वाहन क्षेत्रात ४६ हजार कोटी किंवा आयटीमध्ये ३२ हजार कोटी इत्यादी. नेहमीप्रमाणे यातून हजारो रोजगार निर्माण होणार असल्याचे सांगितले गेले आहे. यापूर्वी काँग्रेसच्या आणि नंतर भाजपच्या काळातले मुख्यमंत्री याच रीतीने वर्षानुवर्षे दावोसला जाऊन असेच दावे करीत आले. त्या करारांपैकी किती प्रत्यक्षात आले याबद्दल शिंदे सरकारने एक श्वेतपत्रिकाच काढायला हवी. शिवाय, पुढच्या वर्षी जे कोणी मुख्यमंत्री असतील त्यांनी यंदाच्या एक लाख ३७ हजार कोटींचे काय झाले हेही जाहीर करायला हवे. नाणार आणि जैतापूर प्रकल्पांचे करार होऊन बसलेले आहेत. स्थानिक नागरिकांचा आक्षेप आणि गरजा लक्षात न घेता परस्पर ते करण्यात आले होते. त्यामुळे ते पुढे सरकू शकलेले नाहीत. अन्य काही प्रकल्प मध्यंतरी परस्पर गुजरातने आपल्याकडून पळवले. महाराष्ट्र हे प्रगत औद्योगिक राज्य आहे. मुंबईसारखे जागतिक कंपन्यांना आकर्षक वाटणारे शहर आपल्याकडे आहे. त्यामुळे योग्य धोरणे आखली तर गुंतवणूक आपल्या दाराशी चालत येते हा पूर्वापारचा अनुभव आहे. पण, केवळ मुंबईच्या आसपास नव्हे तर सर्वत्र ही गुंतवणूक जावी यासाठी सरकार काय करणार हा कळीचा प्रश्न आहे. साधा अलिबाग-वडखळ रस्ता धड न करू शकणाऱ्या आणि बहुसंख्य ठिकाणचा पाण्याचा प्रश्न सोडवू न शकणाऱ्या सरकारला साध्या आणि मूलभूत गोष्टींकडे लक्ष देण्याचीच अधिक गरज आहे.

शिक्षणाचा बोजवारा

'प्रथम' या संस्थेचा 'असर' हा अहवाल यंदाही निराशाजनक आहे. देशभरातील शालेय शिक्षणाच्या स्थितीची पाहणी करून दरवर्षी ही संस्था हा अहवाल तयार करीत असते. भाषा आणि गणितातील विद्यार्थ्यांची प्रगती कशा प्रकारे चालू आहे त्याचा एक अंदाज या अहवालावरून येत असतो. त्यानुसार, आठव्या इयत्तेतील सुमारे २५ टक्के मुलांना दुसरी इयत्तेतील मराठीची पुस्तकेही धड वाचता येत नाहीत असे आढळले आहे. मात्र त्याहूनही वाईट म्हणजे पाचवीतील ऐशी टक्के विद्यार्थ्यांना दोन अंकी वजाबाकी आणि ६५ टक्के मुलांना भागाकाराचे गणित येत नाही असे दिसून आले. महाराष्ट्रात दुसरीचे धड तिसरीत वाचू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी २०१८ मध्ये ४२ होती ती यंदा २६ वर घसरली आहे. देशाच्या पातळीवरही अशीच घसरण झाली आहे. कोरोनाच्या काळात मोबाईलवरून ऑनलाईन शिक्षण चालू राहिल्याबद्दल सरकारे अभिमानाने दावे करत असतात. प्रत्यक्षात या काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा बोजवारा उडाल्याचे दिसते. अन्यथा एकाच वर्षात अभ्यास समजण्यामध्ये इतकी घसरगुंडी संभवत नाही. कोरोनाचाच परिणाम म्हणून बहुदा बहुसंख्य पालकांना आता खासगी शाळा परवडेनाशा झाल्या आहेत. त्यामुळे सरकारी शाळांमध्ये दाखल होणाऱ्या मुलांची टक्केवारी पाच ते दहा टक्क्यांनी वाढली आहे. अजूनही तीस टक्के शाळांमध्ये शौचालये नसल्याचेही या पाहणीत दिसून आले आहे. मुलींच्या शिक्षणावर याचा नक्कीच परिणाम होत असला पाहिजे. एकीकडे विद्यार्थ्यांची उपस्थितीते. वाढावी म्हणून सरकार माध्यान्ह भोजनासारख्या योजना राबवत असते. त्याचा अनुकूल परिणाम गेल्या काही वर्षात दिसला आहे. मात्र शिकवण्याचा दर्जा आणि मुलांची समज वाढवण्यासाठीही आता जोरदार मोहिम हाती घेण्याची गरज आहे. भारत यंदा चीनलाही मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश होणार आहे. या लोकसंख्येत तरुणांची म्हणजेच नोकऱ्या वा उद्योगधंदे करून अर्थव्यवस्थेत भर टाकणारांची संख्या सध्याच्या दशकात सर्वाधिक राहणार आहे. याला डेमॉग्राफिक डिव्हिडंड असे म्हणतात. मात्र हे तरुण उत्तम शिकलेले असले तरच ते नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये भराभर आत्मसात करू शकतात. तसे नसेल तर त्यांची उत्पादकता अगदीच कमी राहील. जे चित्र आपल्या आजूबाजूला दिसते आहे. नुकत्याच झालेल्या पोलिस भरतीत हवालदार वा तत्सम जागांसाठी दोन दोन पदव्या घेतलेले किंवा एमबीए वगैरे झालेले तरूण रांगेत उभे दिसले. नोकऱ्या नाहीत हा एक भाग आहेच. पण त्याचसोबत या तरुणांना जे शिक्षण मिळाले आहे त्याचा दर्जाही इतका नाही की ते त्या आधारे अधिक चांगले वा उत्पादक काम करू शकतील. आज वरच्या थरातील मूठभरांना भरपूर पैसे टाकून उत्तम शिक्षण मिळू शकते. ते परदेशीदेखील जाऊ शकतात. पण तळाचे बहुसंख्य तरुण या वाईट दर्जाच्या व्यवस्थेत शिक्षण घेत राहतात. हे चित्र बदलायला हवे. अन्यथा दरवर्षी येणाऱ्या निराशाजनक अहवालांवर पोकळ चर्चा आपण करीत राहू.

विचार

धोका आणि इशारा

गेल्या काही दिवसांमधील दोन भाषणांची जास्त चर्चा होत आहे. उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी संसदेत आणि जयपूरमध्ये विधानसभा अध्यक्षांच्या अधिवेशनात थेट सर्वोच्च न्यायालयाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केले. दुसरीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांच्या कलाने वागायला हवे, असे म्हटले. त्यांचे हे वक्तव्य दिलासा आहे की इशारा, असा प्रश्न विचारला जात आहे.

शिवाजी कराळे

आपल्या राज्यघटनेने न्यायपालिका, कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या कार्याची विभागणी केली आहे. त्यांचे हक्क, अधिकार आणि कामाच्या सीमारेषाही आखून दिल्या आहेत. त्यापैकी कुणीही कुणाच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करता कामा नये. अधिकारांचे उल्लंघन करून इतरांच्या क्षेत्रात हस्तक्षेप करणे हे संविधानाच्या मूलभूत ढाच्याला धक्का लावण्यासारखे आहे. संविधानाने कलम १४, १५ आणि १६ मध्ये समानतेशी संबंधित काही मुद्दे दिले आहेत. त्यात धर्म, वंश, जात, लिंगाच्या आधारे भेद करता येणार नाही, असे म्हटले आहे. भारतात हिंदू आणि मुस्लिमांमध्ये धर्माच्या आधारे भेद करता येणार नाही. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी 'मुस्लिमांनी घाबरण्याचं कारण नाही. हिंदू व मुस्लिम ांचा डीएनए एकच आहे', असे अलिकडेच म्हटले. या वक्तव्याचे स्वागत करायला काहीच हरकत नाही; परंतु त्यांचे पुढचे वाक्य जास्त गांभीर्यानं घेण्यासारखे आहे. अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांच्या कलाने वागायला हवे, असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. यातून त्यांनी मुस्लिमांना धीर दिला की इशारा असा मुद्दा पुढे आला. दरम्यान, उपराष्ट्रपती धनखड यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये न्यायव्यवस्थेच्या अधिकारांच्या मर्यादेवर टिप्पणी केली. संसदेने मंजूर केलेल्या राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाचा कायदा २०१५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला होता. या कायद्याद्वारे न्यायवृंदाचे न्यायिक नियुक्तीचे अधिकार काढून घेण्यात आले होते. हा कायदा रद्द करण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाला धनखड यांनी कडाडून विरोध केला. अलिकडेच जयपूर येथे देशभरातील विधानसभा अध्यक्षांच्या अधिवेशनात धनखड यांनी सर्वोच्च न्यायालयावर पुन्हा टीका केली.

श्री. धनखड यांच्या वक्तव्यावर कायदेतज्ज्ञांनी टीका केली. लोकशाहीत संसद नव्हे तर संविधान सर्वोच्च असते, या शब्दांमध्ये माजी केंद्रीय मंत्री पी. चिदंबरम यांनी धनखड यांची भूमिका चुकीची असल्याचे म्हटले. काँग्रेसचे माध्यम विभाग प्रमुख जयराम रमेश यांनी धनखड यांनी उल्लेख केलेल्या केशवानंद भारती यांच्या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा मैलाचा दगड मानला जातो, असे सांगितले. भाजपचे दिवंगत नेते अरुण जेटलींनी या निकालाचे स्वागत केले होते. जेटली यांनी हा निकाल मैलाचा दगड असल्याचे म्हटले होते. आता राज्यसभेचे सभापती हा निकाल चुकीचा असल्याचे सांगत आहेत. त्यांची ही भूमिका म्हणजे न्यायव्यवस्थेवर केलेला हल्लाबोल असल्याचे ट्वीट जयराम रमेश यांनी केले. राजकीय नेत्यांनीच नव्हे, तर अनेक कायदेतज्ज्ञांनी धनखड यांच्या विधानावर टीका केली आहे. सर्वोच्च न्यायालयावर टीका करण्यात धनखड यांच्याबरोबर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचाही सहभाग होता. न्यायालये विधिमंडळाच्या कामकाजात हस्तक्षेप करत असल्याची टीका राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी केली होती. देवेंद्र फडणवीस यांनीही सरकारविरोधातील न्यायालयाच्या टिप्पण्यांवर आक्षेप घेतला होता. सर्वोच्च न्यायालय युक्तिवादाच्या आधारे आणि पुराव्याच्या आधारे एखाद्या प्रकरणाचा निकाल देते, त्यामुळे विरोधी पवित्रा घेण्याचा प्रश्नच येत नाही. या खटल्यात केशवानंद यांच्या वतीने प्रसिद्ध वकील नाना पालखीवाला हजर होते.

केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार या खटल्यात केशवानंद भारती हे मुख्य याचिकाकर्ते होते. त्यांच्या याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेची मूलभूत रचना बदलता येणार नाही, हे तत्त्व मान्य केले. निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने संविधानाला संसदेपेक्षा उच्च मानले होते. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, कलम ३६८ नुसार संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार संसदेला आहे; परंतु तो मर्यादित आहे. म्हणजेच, मूलभूत रचना बदलत नाही, तोपर्यंत दुरुस्ती होऊ शकते. ही घटनादुरुस्ती संविधानाच्या प्रास्ताविकाच्या विरोधात नसावी, असेही न्यायालयाने म्हटले होते. स्वतंत्र भारतातील सर्वात मोठे खंडपीठ स्थापन झाले तेव्हा इंदिरा देशाच्या पंतप्रधान गांधी होत्या. या निर्णयाचा थेट परिणाम संसदेच्या अधिकारांवर होणार होता. सर्वो च्च न्यायालयाने सातविरुद्ध सहा अशा बहुमताने निर्णय दिला. उपाध्यक्ष जगदीप धनखर यांनी अलीकडेच केशवानंद भारती प्रकरणाचा संदर्भ देत न्यायव्यवस्था संसदेच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करू शकत नाही; संसदेने केलेला कायदा न्यायालयाने अवैध ठरवला तर ते लोकशाहीसाठी चांगले नाही, असे उपराष्ट्रपती म्हणाले होते. सर्वोच्च न्यायालयाने २०१५ मध्ये राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा रद्द केल्याचाही त्यांनी निषेध केला. संसदेने केलेला कायदा घटनात्मक आहे की नाही, तो मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करत नाही ना, हे तपासण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करते. सध्याच्या नेत्यांना ते मान्य दिसत नाही. न्यायालयाने दिलेले अनेक निर्णय फिरवताना संसदेने कायदे केले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने हरकत न घेता संसदेचा अधिकार मान्य केला होता, हे या नेत्यांना माहीत नसावे.

कडव्या हिंदुत्वाचा पुरस्कार करताना मतांच्या ध्रुवीकरणाचा फायदा उठवण्याचा भाजपचा प्रयत्न एकीकडे सुरू आहे आणि त्याच वेळी भाजपची मातृसंस्था असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मात्र गेल्या काही महिन्यांपासून मुस्लिम समाजाला जवळ करण्याचा प्रयत्न करत आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांनी या देशात इस्लामला धोका नाही आणि मुस्लिमांनी घाबरण्याचे कारण नाही, असे सांगून पुन्हा एकदा राजकारण तापवले आहे. नूपूर शर्मा यांनी प्रेषितांविषयी कथित अवमानकारक वक्तव्य केल्यानंतर देशातील मुस्लिम समाज भाजपवर नाराज झाला. जगातील काही देशांनीही अशाच प्रतिक्रिया व्यक्त केल्या. सुधारित नागरिकत्व कायदा आणि समान नागरी कायद्याच्या हालचालीमुळे मुस्लिमांमध्ये अगोदरच नाराजी असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मात्र मुस्लिमांविषयीची बदलती भूमिका व्यक्त करून या समाजात स्थान मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. भागवत यांनी याआधीही काही प्रसंगी मुस्लिमांना बहुसंख्याकांमुळे घाबरून जाण्याचे काहीच कारण नाही, असे म्हटले होते. असे म्हणून संघाला कोणता संदेश द्यायचा आहे, असा प्रश्न पडतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुस्लिमांना 'आपण मोठे आहोत' ही भावना सोडावी लागेल, असेही भागवत म्हणाले आहेत. म्हणजेच संघाचा विश्वास आहे की मुस्लिम स्वत:ला श्रेष्ठ सिद्ध करण्यासाठी समाजात प्रतिकूल वातावरण निर्माण करण्यात मागे रहात नाहीत. त्यामुळे मुस्लिम समाजाने आपला दर्जा विसरून अल्पसंख्याक म्हणून देशात राहण्याची आणि इतर वर्गात मिसळून राहण्याची सवय लावावी, असा इशाराही या विधानात आहे. तो अनुल्लेखित आहे एवढाच त्याचा अर्थ. या आधीही भागवत म्हणाले होते की या देशातील हिंदू आणि मुस्लिमांचा डीएनए एकच आहे. कारण दोघांचे पूर्वज एकच आहेत. त्यानंतर काही मुस्लिम संघटना आणि 'एमआयएम' प्रमुख असदुद्दीन ओवेसी यासारख्या नेत्यांनी त्यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेतला होता. संघाचे मुखपत्र 'पांचजन्य' आणि 'ऑर्गनायझर'ला दिलेल्या मुलाखतीत भागवत यांनी अनेक विषयांवर संघाची भूमिका मांडण्याचा आणि केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर मुस्लिमांवर अत्याचार होत असल्याचा समज मोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. काँग्रेससह इतर विरोधी पक्ष आणि प्रसारमाध्यम ांच्या एका वर्गानेही गेल्या आठ वर्षांपासून देशात भीती आणि द्वेषाचं वातावरण निर्माण केलं आहे, असे संघाचे म्हणणे आहे. त्यांच्या मते, हिंदू ही आपली ओळख आणि राष्ट्रीयत्व असण्याबरोबरच प्रत्येकाला आपले मानून सोबत घेण्याची प्रवृत्तीही आहे. हिंदुस्थान हिंदुस्थानच राहिला पाहिजे, हा संघाचा उद्देश आहे. त्यात भारतात असलेल्या मुस्लिमांचे काहीही नुकसान नाही. संघ किंवा त्याच्या विचारांचा प्रचार करणारे कोणतेही सरकार राष्ट्र तोडणाऱ्या शक्तींना खपवून घेणार नाही; मग ते इस्लामशी संबंधित असो वा हिंदू समाजाशी... भागवत यांचे संकेत स्पष्ट आहेत. त्यांना लोकांना समजावून सांगावे लागले की आम्ही मोठे आहोत. आम्ही एके काळी राजे होतो, पुन्हा राजा व्हायला हवं. वस्तुत: ही भावना सोडावी लागेल. असा विचार करणारा उजव्या विचारांचा असो वा कम्युनिस्ट; देश आणि समाजहितालाच प्राधान्य द्यावे लागेल.

आजकाल

भाजप गवत (चिमुक काटा गवत) :

सोमिनाथ घोळवे

गेल्या १५ दिवसांपूर्वी अहमदनगर, शेवगाव, पाथर्डी, शिरूर कासार, बीड, केज, जामखेड, आष्टी असा दौरा झाला... या दौऱ्यात सर्वत्र एक बाब निदर्शनास आली ती म्हणजे शेतीच्या बांधावरच नाही, तर शेतात देखील भाजप (चिमुक काटा) गवताचा जास्त प्रमाणात झालेला फैलाव....(पहा फोटो). या संदर्भात अनेक शेतकऱ्यांशी चर्चा देखील केली... सर्वजण या गवताला भाजप गवत याच नावाने ओळखत असल्याचे दिसून आले. या गवताला भाजप गवत का म्हणतात हा प्रश्न मला पडला ? या संदर्भात बऱ्याच शेतकऱ्यांशी बोलणे झाले. शेतकऱ्यांकडून आम्ही भाजप गवत असेच म्हणतो, याच नावाने ओळखतो असे उत्तर मिळाले. एका अर्थाने या विदेशी गवताला शेतकऱ्यांनी नवीन ओळख दिली असल्याचे दिसून आले. भाजप गवताची ओळख ही अलीकडची नाही तर गेल्या तीन-चार दशकांपासून आहे. पण अलीकडे मोठ्या प्रमाणावर बांधावर , शेतात आणि मोकळ्या जागेवर वाढ झाल्याने हे गवत सर्वत्र चर्चेला येते.

या गवताला प्रत्येक कांड्यावर बारीक अचकुणीदार काटे असल्याने शेतकरी चिमुक काटा असे म्हणत होते. पण ही ओळख अलीकडे पूर्णपुणे मिटलेली आहे... काही वयस्कर शेतकऱ्यांशी चर्चा केल्यावर चिमुक काटा गवत असे म्हणतात असे ऐकण्यास मिळाले... अलीकडील सर्व तरुण शेतकरी या गवताला भाजप गवत असेच म्हणतात...तरुण शेतकऱ्यांना या गवताचे मूळ आणि उपयोग असे काहीही माहीत नसल्याचे दिसून आले. मात्र काँग्रेस गवत कमी होऊन हे भाजप गवत वाढले आहे, ऐवढेच गावांगावात शेतकऱ्यांकडून सांगण्यात येते.

या गवताचा वाढीचा वेग वाढला असल्याने शेतकऱ्यांना मोठा त्रास वाढला आहे. अनेक शेतकरी तणनाशक फवारणी करून या गवताला मारण्याचा प्रयत्न करत आहेत..मात्र हे गवत मरत नाही. हे तितकेच खरे आहे... हे गवताचे पूर्ण आयुष्य झाल्यानंतर (वाळल्यावर) पेटवून देण्याशिवाय शेतकऱ्यांकडे काहीच पर्याय राहत नाही. गवताला आग लावून जाळले तरी पाऊस पडला की नव्याने उगवून येते. तसेच वेगाने वाढ देखील होते.

अतिवृष्टीने गावोगावच्या मोकळ्या जागेवर भाजप गवताचा फैलाव वाढला आहे. मी १९९० ते २००८ पर्यंत या गवताला ऊसाच्या शेतीत आणि बांधावर पाहत होतो. पण अलीकडे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये याचा फैलाव मोठ्या प्रमाणावर झालेला आहे...विशेषत: बागायती परिसरात या गवताची वाढ वेगाने होताना दिसून येते.

अल्टरनेनथेरा चेसिलिज या शास्त्रीय नावाने परदेशात या गवताला ओळखले जाते. हे गवत मुळात परदेशी आहे. सुमारे ४० /४५ वर्षपूर्वी अमेरिकेतून गव्हाच्या माध्यमातून गाजर गवताचे बी आले... नंतर ते मोठ्या प्रमाणावर फोफावले....त्या गवतास काँग्रेस गवत असे म्हटले गेले. त्याच प्रमाणे भाजप गवताची वाढ आणि प्रसार देशातील भाजप पक्षाच्या बरोबरीने असल्याने भाजप गवत अशी ओळख या शेतकऱ्यांनी दिली असावी, असे काही जुन्या जाणत्या शेतकऱ्यांचे मत आहे.

भाजप गवताचे वैशिष्ट्ये असे की, या चालू वर्षात या गवताचे उदंड असे पीक आले आहे... कोवळे असताना खूपच हिरवेगार पालवी असणारे आणि लसलसीत दिसते... जनावरे देखील आवडीने-चवीने खातात... पण हे गवत जसे परिपक्व अवस्थेकडे जाते. त्यावेळी जनावरांच्या नाकाला काटे टोचू लागतात. त्यामुळे परिपक्व झालेले हे गवत जनावरे खात नाहीत. गवत कोवळे असताना जनावरांच्या चाऱ्यामुळे शेतकऱ्यांना आकर्षक वाटते. पण परिपक्व झाले की त्रास होतो. या गवतामध्ये प्रोटीन, कार्बो हायड्रेट, खनिज याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दूध उत्पादनात वाढ होत असल्याचे मत काही शेतकऱ्यांनी सांगितले. या गवतावर सखोल संशोधन होणे आवश्यक आहे.. नाहीतर भविष्यात शेतकऱ्यांना खूप त्रास देणारे गवत म्हणून उदयाला येईल असा अंदाज शेतकरी सांगतात.

व्हायरल

देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे

वैदिक काळात मंदिरं नव्हती.

गौतम बुद्ध, महावीर यांनीही प्रार्थनास्थळांशिवाय उपदेश केला.

सम्राट अशोकाने स्तूप बांधले पण प्रार्थनास्थळं बांधली नाहीत.

तरिही हिंदू राजांनी देवळं बांधली

देवळांभोवती एक अर्थव्यवस्था उभारली

त्यातून ब्राह्मणांचं भलं झालं, व्यापार्यांचं, उद्योजकांचं भलं झालं.

मुसलमान आक्रमकांनी मंदिरं लुटली, फोडली तरिही हिंदूंचं मंदिरांचं वेड कायम राह्यलं.

बहुतेक सर्व संतांनी (सगुण वा निर्गुण) मंदिरात देव नसतो हे सांगितलं

त्यांना देव बनवून हिंदूंनी त्यांची मंदिरं उभारली.

देव देवळात नसतो हे मुसलमानांनी सिद्ध केलं, सर्व संतांनीही सांगितलं पण हिंदूंचा देवळांवरचा विश्वास कमी झाला नाही.

ब्राह्मण वेगवेगळी कर्मकांडं शोधत राह्यले.

उदाहरणार्थ मीनाक्षी मंदिरात सोन्याचा मुलामा देणारी कार अर्पण करण्याचं कर्मकांड पुरोहितांनी १९९० च्या सुमारास शोधलं. भक्ताने अशी कार अर्पण केली की या कार रुपी रथातून तिची मिरवणूक मंदिर परिसरात काढण्यात येते. हे सर्व भक्त भांडवलदार, व्यापारी असतात.

देव देवळात नसतो, देव नवसाला पावत नाही या साध्या बाबी हिंदूंना मान्य नाहीत.

बुद्धीवंत, शास्त्रज्ञ, भांडवलदार, आयटी प्रोफेशनल्स, कोणीही.

बहुसंख्य हिंदूंना देवापेक्षा देवळं आणि नवस प्यारे असतात.

गावागावात मंदिरांचे जिर्णोद्धार होतात.

शाळा, आरोग्यकेंद्र, इस्पितळं यासाठी हिंदू लोक अपवादानेच एकत्र येतात.

शाळा, आरोग्य केंद्र वा इस्पितळ उभारलं की त्यामध्ये देवाची स्थापना करतात.

या देशात ३०-४० लाख प्रार्थनास्थळं असतील, त्याशिवाय छोटी-मोठी मंदिरं करोडोंच्या संख्येने असतील. १.३ अब्ज लोकसंख्येच्या देशात इस्पितळं मात्र काही हजार आहेत. शाळा आणि महाविद्यालयं प्रार्थनास्थळांच्या तुलनेत निम्म्यापेक्षाही कमी आहेत.

सुशिक्षितांमध्ये बुवा, बाबा, साधू, साध्वी यांचं सर्वाधिक आकर्षण आहे. सुशिक्षित परदेशी इंग्लड वा अमेरिकेत गेल्यावर तिथे देवळं बांधतात, शाळा, महाविद्यालयं, विद्यापीठं यांची उभारणी करत नाहीत.

या देशात म. फुले यांनी क्रांतिकारी विचार मांडले, कार्य केलं, गांधीजी वा नेहरू वा बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्य केलं. हा इतिहास हीच मला फिक्शन वा कल्पनारम्यता वाटते. शाळा असो की महाविद्यालय वा विद्यापीठ वा रस्ता वा अन्य काही यांना या महापुरुषांची नावं देणं त्यासाठी आंदोलन करणं, प्रचार करणं आणि आपली मागणी पूर्ण झाली की आनंद साजरा करणं, हा या देशातला पुरोगामी कार्यक्रम मानला जातो.

या देशात सर्वाधिक लांगूलचालन हिंदूंचं होतं ही साधी वस्तुस्थितीही हिंदूंना मान्य नसते. आपण ८० टक्के असूनही हिंदू स्वत:ला असुरक्षित मानतात.

मी हिंदू आहे. धार्मिक वा सांस्कृतिक वा सामाजिक. परंतु हिंदूंबाबत मी बिल्कुल आशावादी नाही.

- सुनील तांबे

लोकसंसद

जिगरबाज कर्मचाऱ्याने जीव धोक्यात घालून वाचवला तिरंगा

देशाची शान असलेला तिरंगा भारतीयांना जीवापेक्षा प्रिय आहे. तिरंग्यासाठी सीमेवर जवान आपल्या प्राणाचे बलिदान देण्यासाठी तयार असतात. फक्त सीमेवरच नाही, तर देशातही लोक आपल्या तिरंग्याची शान कमी होऊ देत नाहीत. अशीच एक घटना हरियाणातील पानिपतमध्ये घडल्याची बातमी वाचनात आली.अग्निशमन विभागात तैनात असलेल्या सुनील मेहला यांनी तिरंग्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालून आपल्या देशाची शान असलेला तिरंगा ध्वज आगीपासून वाचवला आहे पानीपत शहरातील भारत नगर येथील एका सूतगिरणीला भीषण आग लागली. आगीच्या वेळी मिलच्या मुख्य गेटच्या छतावर एक तिरंगा फडकत होता. हा तिरंगा आगीत जळाला असता, पण जिगरबाज सुनील यांची नजर तिरंग्यावर पडली. यानंतर स्वत:च्या जीवाची पर्वा न करता सुनील छतावर चढले आणि तिरंगा सुखरुप खाली आणून शेजारच्या कारखान्यात आदराने ठेवला.फायरमन यांना सुरुवातीपासूनच प्रशिक्षण दिले जाते की, जेव्हा जाळपोळ होण्याची घटना घडते, तेव्हा त्या भागावर सर्व बाजूंनी लक्ष ठेवले पाहिजे. दरम्यान सुनील इकडे तिकडे पाहत असताना त्यांची नजर तिरंग्याकडे गेली. त्यावेळी त्यांच्या मनात एवढंच होतं की, तिरंगा आगीत जळाला नाही पाहिजे, यासाठी स्वत:चा जीव धोक्यात गेला तरी चालेल. मात्र आपल्या तिरंग्याला काहिही होता कामा नये त्यासाठी त्यांनी जीव धोक्यात घातला. मेहला हे फायर इंजिन चालवत होते. त्यावेळी त्यांचा उत्साह इतका होता की काही सेकंदातच ते छतावर चढले आणि लगेच तिरंगा काढला.

- राजू जाधव, मांगूर

प्रेरणा

मंदिर

ओशोकडे एक जैन सद्गृहस्थ मुक्कामाला होते.

एक दिवस त्यांनी ओशोला विचारलं, इथे जवळपास जैन मंदिर आहे का?

ओशोने विचारलं, का हो?

थोडी प्रार्थना आणि ध्यानधारणा करायची आहे. ओशो म्हणाला, इथलं जैन मंदिर भर बाजारपेठेत आहे. तिथे भयंकर कलकल असते. तुम्हाला शांतपणे, एकाग्रचित्ताने प्रार्थना करता येणं कठीण आहे. तुम्ही इथे माझ्या घरातच करा ना ध्यानधारणा. इथे तिथल्यापेक्षा अधिक शांतता आहे. ते गृहस्थ म्हणाले, नको. नको. शेवटी प्रार्थनास्थळ ते प्रार्थनास्थळ. ओशो म्हणाला, मग तुम्ही इथून जवळच असलेल्या एका चर्चमध्ये जाता का? आज रविवार नसल्यामुळे तिथे तर अजिबात कोणीही नसेल. शिवाय अतीव शांतता लाभेल. त्या गृहस्थांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहिल्यावर ओशो म्हणाला, तुम्ही जैन मंदिरातच जा. अशीही तुम्हाला निरर्थक प्रार्थना बडबडायचीच तर आहे.

निवडक

अंनिसकडून कलाप्रदर्शन

पनवेल : अंधश्रद्धा निर्मूलन समिती पनवेल शाखेच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कलाप्रदर्शन २१ व २२ जाने रोजी आगरी समाज मंडळाच्या महात्मा जोतिबा फुले सभागृहात तळमजल्यावर असेल. प्रदर्शनाचे सकाळी ९ वाजता उल्का महाजन यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी ९ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी खुले असेल. अधिक माहितीसाठी सिद्धेश ९८७०९११९११ व नाजूका ८९७६८७१३८१ यावर संपर्क साधावा.

स्पर्धा परीक्षांवर व्याख्यान

उरण : उरण नगरपरिषदेचे माँसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालयात डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी, अमरावती या संस्थेचे राज्याच्या समनव्यक सोनाली बुंदे आणि धीरज रामदास बुंदे यांचे 'स्पर्धा परीक्षेची तयारी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल संतोष पवार यांनी केले. या कार्यक्रमाला निवृत्त सहाय्यक आयुक्त सुधाकर पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

कोर्लई : मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत कोकण मराठी साहित्य परिषद मुरुड-जंजिरा शाखा व युवाशक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुडमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुरुड-जंजिरा कोकण मराठी साहित्य परिषदेचे शाखाध्यक्ष संजय गुंजाळ यांनी दिली आहे. यानिमित्ताने दि.१९ ते २७ जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रम होणार असून, त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आरोपीला सक्तमजुरी

श्रीवर्धन : श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साखरी या गावामध्ये तरुणीचा विनयभंग करण्याची घटना घडली होती. २०११ साली घडलेल्या या गुन्ह्याची केस माणगाव सत्र न्यायालयामध्ये सुरू होती. गुन्ह्याचा तपास तत्कालीन तपासी अंमलदार पोलिस नाईक विकास खैरनार हे करीत होते. बुधवारी आरोपी दत्तात्रय पांडुरंग गजमल (३६), रा. साखरी, ता. श्रीवर्धन याला एक वर्ष सक्तमजुरी व ५००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. याप्रकरणी सरकारकडून ॲड. जे.डी. म्हात्रे यांनी काम पाहिले.

हळदीकुंकू कार्यक्रम

रसायनी : जाखमाता महिला बचत गटाच्या माध्यमातून दि.१९ जानेवारी रोजी तिळगूळ व हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त महिलांसाठी विशेष संगीतखुर्ची व पैठणीचा खेळ असे विविध मनोरंजनात्मक खेळ खेळले गेले. यावेळी जाखमाता महिला बचत गट झोतिरपाडा येथील महिला कळाश्री भोय, सरिता पाटील, सनम पाटील, माधुरी भोय, राजश्री कुथे, भारती मढवी, वैशाली कोळी, नैना तरे, सुषमा वारगे, प्रिया हळदणकर, अंजली हळदणकर आदी उपस्थित होत्या.

दिन वार्ता

पंचांग
२० जानेवारी २०२२ शुक्रवार
विक्रम संवत्- २०७९
शालिवाहन शके संवत्- १९४४
संवत्सर - शुभकृत्नाम,अयन- उत्तराणायन
मास- पौष, ऋतु- हेमंत
कृष्ण पक्ष तिथि:त्रयोदशी १०:००:०३
तिथि:चतुर्दशी ३०:१७:४८+
नक्षत्र:मूल १२:४०:१९
योग:व्याघात १८:५७:१०
करण:वणिज १०:००:०३
करण:विष्टि २०:११:१३
करण:शकुनि ३०:१७:४८+
सूर्यः मकर, चन्द्र:धनु
हिजरी सन् - १४४४
मुस्लिम मास - जमादिलाखर
तारीख - २७
विशेष
शिवरात्र
मेरु त्रयोदशी (जैन)
नित्यानंद मोहिते महाराज पुण्यतिथी - अकोला

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. आरव पाटणकर, अलिबाग
२. कै. नरसय्या य. साईनी, द्वितीय स्मृतिदिन, अलिबाग
३. श्री. निरव खुशाल गडा, वाढदिवस, विद्यानगर, अलिबाग

सुडोकू

		5		7	9	6	8	
8		7		1	5			
	9				8			
6	4	2		8			9	1
1	8			6		5	2	4
			7				1	
			4	5		2		7
	6	1	8	9		4		

गुरूवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

9	5	6	2	1	7	8	3	4
8	1	4	9	5	3	6	7	2
7	3	2	6	4	8	9	5	1
2	7	8	3	9	4	5	1	6
1	4	3	5	6	2	7	9	8
6	9	5	8	7	1	4	2	3
4	6	9	1	3	5	2	8	7
3	8	7	4	2	9	1	6	5
5	2	1	7	8	6	3	4	9

पाण्यावाचून नागरिकांचे हाल

। पाली/वाघोशी । वार्ताहर ।
सुधागड तालुक्याच्या मुख्यालय पाली येथे असणाऱ्या तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांच्या वतीने लाखो रुपये खर्च करून सुबक अशी पाणपोई उभारली आहे. परंतु, तहसील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे बंद झालेल्या पाणपोईमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. महसुली कामानिमित्त सुधागड तालुक्यातील खेडोपाड्यातून अनेक आदिवासी ठाकूर व इतर जनता येत असते. या सर्वांना या

बंद पाणपोईकडे तहसील प्रशासनाचे दुर्लक्ष

पाणपोईच्या माध्यमातून पाणी पिणे सोयीचे होत होते. मात्र, ज्या तहसील कार्यालयाच्या सोयीसाठी ही पाणपोई उभारली. त्याच तहसील प्रशासनाला या पाणपोईकडे लक्ष द्यायला वेळ नाही. परिणामी, ही पाणपोई नेहमीच बंद असते. यामुळे येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत आहे. याबाबत नायब तहसीलदार दत्तात्रय गोष्टी यांना विचारणा केली असता काही तांत्रिक बिघाड झाल्याने ही पाणपोईची फिल्टर मशीन बंद झाली आहे. काही महिन्यांपासून बंद असलेल्या मशीनला आम्ही लवकरच तांत्रिक अडचण दूर करून पाणपोई सुरळीत सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

याबाबत शेकाप पाली शहर सहचिटणीस संजोग शेठ यांनी तहसील प्रशासनावर ताशेरे उडत सांगितले की, तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रेरणेतून सर्वांसाठी पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी याकरिता लाखो रुपये खर्च करून पाणपोई बांधून दिली असली तरी तहसील कार्यालयाकडे दुर्लक्ष करत असेल आणि लोकांचे हालअपेष्टा करत असेल तर ही बाब निंदनीय आहे.

राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा शुभारंभ

। कर्जत । प्रतिनिधी ।

विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा कर्जत तालुक्यातील भोईरवाडी गावामध्ये शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी ग्रामस्थांनी उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हे शिबिरार्थी परिसरातील गावांमध्ये जाऊन जनजागृतीचे धडे ग्रामस्थांना देणार आहेत.

भोईरवाडी गावातील श्री मरीआई मातेच्या मंदिरात शिबिराच्या उद्घाटनाचा समारंभ आयोजित केला होता. कोंकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन काळे यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी

प्रा. अविनाश सूर्यवंशी, डॉ. रेश्मा पोरे, डॉ. दिव्या मेनन, पोलीस पाटील संदीप भोईर, संदेश भोईर, संभाजी भोईर, कीर्तनकार बाळू वाव्हळ, दिलीप लोहट आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन तेजश्री जयभाये या विद्यार्थिनीने केले. याप्रसंगी नरेश भोईर, संतोष पालकर, सुजित भोईर, संजय कोर, गजानन भोईर, कृष्णा दास, रावजी भोईर, रावजी भोईर, दुधा लोहट आदींसह महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

अनिता जाधव यांचे निधन

। कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील गोवे येथील अनिता अंकुश जाधव यांचे बुधवार, दि.११ जानेवारी रोजी वयाच्या ५५ व्या वर्षी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, जावई असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी शुक्रवार, दि.२० जानेवारी रोजी तर उत्तरकार्य रविवार, दि. २२ जानेवारी राहत्या घरी गोवे येथे होणार आहेत.

आदेशाला केराची टोपली

उरण पंचायत समितीला दोन ग्रामपंचायत विस्तार अधिकारी

। उरण । वार्ताहर ।

तालुका वाईज पंचायत समितीला एकच ग्रामपंचायत ग्रामविस्तार अधिकारी असणे अशा प्रकारचा आदेश आहे. मात्र, या आदेशाला केराची टोपली दाखविण्याचे काम उरण पंचायत समितीने करून तालुक्यात दोन ग्रामपंचायत ग्रामविस्तार अधिकारी कार्यरत आहेत. याची विचारणा जिल्हा परिषदेचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी भालेराव व उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्याकडे करूनही ते याचे उत्तर देत नाही.

ग्रामपंचायत निवडणुकीपूर्वी माणगाव पंचायत समितीमधून विनोद मिंडे यांची बदली उरण पंचायत समितीमध्ये झाली होती. ग्रामपंचायत निवडणूक होऊन काही दिवसांचा अवधी उलटूनही उरणमधील ग्रामपंचायत ग्रामविस्तार अधिकारी अनिल नारंगीकर यांना पदमुक्त न करता ते आजही कार्यरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीचा कारभार हा एक ग्रामपंचायत ग्रामविस्तार अधिकारी कार्यभार सांभाळू शकतो. अशा प्रकारचा सक्त आदेश असतानाही उरणमध्ये या नियमांचे सर्रासपणे उल्लंघन करून सध्या तरी दोन ग्रामपंचायत ग्रामविस्तार अधिकारी कार्यरत आहेत. याची जबाबदारी कोणी अधिकारी घेताना दिसत नाही.

याबाबत जिल्हा परिषदेचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी भालेराव व उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्याकडे मोबाईल फोनद्वारे विचारणा केली असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. याबाबत लवकरच ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दाद मागून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

महिलांचा उपोषणाचा इशारा

। उरण । वार्ताहर ।

साई प्रेरणा कॉलनीतील रहिवाश्रह व द्वारकानगरी महिला बचत गटातील महिलांनी गुरुवारी उरण नगरपरिषदेमध्ये रस्ता आणि गटारे आदी मागण्यांसाठी उपोषणाचा इशारा दिला आहे. गेली २२ ते १५ वर्षे अनेकवेळा तक्रारी करूनही सुविधा मिळत नसल्याने येत्या २६ जानेवारी रोजी उरण नगरपालिका कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे शेकाप महिला आघाडीच्या अध्यक्षा सीमा घरत यांनी सांगितले.

सीमा घरत आणि साई प्रेरणा कॉलनीतील रहिवासी संघ यांच्या वतीने एकदिवसीय उपोषण करण्यात येणार आहे. गेली बारा ते पंधरा वर्षे या भागात ६० ते ६५ घरे नगरपालिकेच्या हद्दीत आहेत. सर्व रहिवासी टॅक्स भरत असताना गेली १२ वर्षे रस्ते व गटाराची सुविधा आजपर्यंत करण्यात आली नाही.

त्यामुळे सर्व रहिवासी संतप्त झालेले आहेत. यावेळी सीमा घरत, मनोज कुमार, शर्मिला गावंड, गीता गावंड, हेमंलता पाटील, भारती घरत, सुषमा माळी, राकेश सहोता आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय रास्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त रॅली

। रसायनी । वार्ताहर ।

राष्ट्रीय रास्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा व अशोक भाऊ मुंढे फौंउडेशन व टाकेदेवी रिक्षा चालक मालक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने एका रॅलीचे आयोजन बालाजी ऑटोबाईल्स ते भटवाडी गाव असे करण्यात आले होते. या रॅलीत रस्ता सुरक्षाविषयक पोस्टर्स छळकत होते. यावळी वाहनचालकांना व परिसरातील नागरिकांना वाहन चालविताना आपली

सुरक्षा कशी घ्यावी यावर माहिती देण्यात आली. या रॅलीची सांगता अशोक मुंढे यांच्या फार्म हाऊस येथे करण्यात आली.

दरम्यान, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. यावेळी आरटीओ कळंबोली अधिकारीदेखील उपस्थित होते. या रॅलीत माजी सरपंच अशोक मुंढे, माजी पोलीस अधिकारी गोरे, क्लबचे माजी अध्यक्ष रोटरीयन सुनील भोसले व रसायनी पोलिसांचे विशेष सहकार्य लाभले.

रंगभूमी माझ्यासाठी तीर्थक्षेत्र आहे : चिर्लेकर

। चिरनेर । वार्ताहर ।

रंगभूमी माझ्यासाठी तीर्थक्षेत्र आहे. रसिकांच्या प्रेमामुळे माझा नाट्य प्रवास सतत उंचावत राहिला. आज माझे वय ७६ वर्षाचे आहे. वयाचा विचार करता मला हे शिवधनुष्य उचलणे अवघड आहे. मात्र, तुम्हा कलाकारांचे नाट्यकलेवर असलेले प्रेम आणि तुमचा माझ्यावर असलेला विश्वास त्यामुळे तुमच्या आग्रहाचा मान ठेवून या नाटकासाठी मला शक्य होईल तेवढे मी तुम्हाला मार्गदर्शन करीत राहीन, असे उद्‌गार ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर यांनी काढले.

उरण तालुक्यातील मोठेभोम या नाट्यवेड्या गावात कमलाकर बोरकर लिखित हिरवा चुडा या नाटकाच्या संहितेचा शुभारंभ मोठेभोम येथील प्राथमिक शाळेत मकर संक्रातीच्या दिवशी रविवारी १५ जानेवारी रोजी वसंत चिर्ले कर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सहदिग्दर्शक विजय केणी, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे, रंगकर्मी कमळाकर पाटील तसेच अन्य जण उपस्थित होते. हनुमान जयंती उत्सव सोहळ्याच्या निमित्ताने दि. ७ एप्रिल रोजी हिरवा चुडा या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येणार आहे. नाटकात सुनील पाटील, चंद्रशेखर पाटील, संग्राम ठाकूर, अनंत पाटील, रोहण पाटील, निलेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, साक्षी म्हात्रे (पनवेल) आदी कलाकारांचा समावेश आहे. या नाटकाची निर्मिती मोठेभोम ग्रामस्थ मंडळ करणार आहे. तर, सहदिग्दर्शन विजय केणी करणार आहेत.

वाहतूक कोंडीने त्रस्त

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरातील रस्त्यात पार्किंग होणारी वाहने यामुळे वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ असल्याने या ठिकाणी पंचक्रोशी भागातील नागरिक याठिकाणी खरेदी-विक्रीकरिता येत असतात. यामुळे गर्दी याठिकाणी जास्त होत असते. त्यातच किरकोळ विक्रेते व त्यांचे ग्राहक रस्त्यावरच ठाण मांडून बसतात. यामुळे वाहतुक कोंडी पावलोपावली होत आहे. अशावेळी वाहनधारकांत वादाचे प्रसंग घडत आसतात. बाजारपेठेतील असा एकही रस्ता राहिला नाही की जेथे वाहतूक कोंडी होत नाही.

शब्दकोडे क्र.१८



आडवे शब्द : १. रोख ४. उपचारासाठी उपयोगी ७. चालता-फिरता९. इंद्राचा हत्ती ११. धाक, भीती १२. शिजणे-उकळणे १४. राजबिंडा, सुकुमार १५. नामस्मरण १६. प्रश्नोत्तरे २०. खरखरीत, असंस्कारित (इंग्रजी) २२. दोन रस्ते छेदतात ते ठिकाण, चौसोपी वाड्याचे अंगण २३. संगीतातील एक राग २४. पंचांगातील 'तास' २६. विश्वासघातकी २९. कृष्णसखी ३०. कथालेखक मिरासदारांच्या नावाची आद्याक्षरे ३२. कांबळी विणणारी जमात ३५. मोठी नदी ३७. होळीपौर्णिमा ३९. गुणवान अनेक असले तरी हा मात्र दुर्लभ! ४१. सप्तस्वर ४२. पाताळ ४३. कालचक्र, लोकरीत ४५. मत्स्य, मीन ४६. धिरड्याला पडल्यास खुसखुशीत ४७. सहा दशके पूर्ण! ४८. मर्यादेची दोन टोके ५१. नोकर, सेवक? ५२. डोके, वरचा भाग ५३. खर्चाची दुसरी बाजू ५५. गाणे कर्णमधुर होण्यासाठी यांची गट्टी जमायला हवी ५६. हवा ५८. बटवा ६०. पैशाला पैसा जोडणारा ६२. नवीन ६३. चेहरा ६४. कंप पावणे ६६. विपत्तीची कहाणी ६७. परमेश्वरी योजना ६९. सैन्याचा दाणागोटा ७१. घर, निवासस्थान ७४. उद्याच्या नंतरचा दिवस ७६. च्या साठी ७९. नजरफेक ८०. बडबड, त्रास ८२. शेंगेवरील आवरण ८३. शाहिरी गीत

उभे शब्द १. ग्रामीण भागात 'मागेल त्याला काम' देणारी योजना २. हात ३. जादूगाराचा 'छू मंतर' सारखा एक मंत्र – आबरा का --- ४. लांबरूंद, ऐसपैस ५. सहा ६. धैर्य, संयम ७. फुटाणे ८. समशेर ९. द्रव्य, सोनेनाणे इ. १०. वृक्ष १३. डोक्यावर मारलेली चापट १६. संतोष १७. मध्यस्थ, पंच १८. वक्रता १९. संकट २१. गणपतीच्या आरतीत आढळणारे रत्नखचित शिरोभूषण २५. फकिरांचा वेष २७. भ्रमर, भुंगा २८. घट्ट मारलेला विळखा ३१. हत्तींचा शिक्षक ३३. धमनी, नाडी ३४. अंगातील मस्ती, जोम ३६. प्रत्येक वर्षी ३८. संगीतातील ठेका ४०. विश्व, दुनिया ४४. चलनवलन ४५. आईचा भाऊ ४७. उंट हाकणारा ४८. गोष्टी रंगवून सांगणे ४९. गडकरी ५०. पावसाळ्यातील निसर्गाचे रंगरूप ५३. प्रचंड, अवाढव्य ५४. मर्कट ५५. अंत:करण ५७. जंगली ५९. तात्पर्य ६१. सापाची एक जात ६३. आवरण, कवच ६५. रोमांचकारी ६८. इंग्रजीत शर्यत, मराठीतील एक सूक्ष्मतेचे मोजमाप ७०. विपत्ती ७२. डोळे ७३. हतीवरील सुशोभित बैठक ७५. बटवड ७७. वागणूक ७८. सूट, दया, क्षमा ८१. दृष्टी, रोखलेली नजर

शब्दकोडे क्र.१७ चे उत्तर

आडवे उत्तर
१.अपमान ६.धनाढय १०.नगरसेवक ११.राव १२.मतलब १४.राघव १५.दक्ष १७.डळमळीत १८.वहिनी २०.पणती २१.खोटा २२.गो २४.मारहाण २५.चेला २६.होरा २८.कचकच ३०.कलमी ३२.साय ३४.लंपट ३५.लालसर ३८.ताठर ३९.बादली ४१.कडका ४२.तमस ४४.रपेट ४६.रसायल ४८.पाळवाट ४९.म्यान ५३.नव ५४.मकरंद ५५.काव्य ५६.मटका ५८.कस ५९.भावनाहीन ६१अ.हुनर ६२.धनी ६३.वर ६४.नजरानजर ६६.राम रस ६८.वर्ण ६९.रामा ७०.चण ७१.साखर ७३.कैकयी ७५.जबर ७७.थवा ७८.पारवा ७९.अगोदर ८०.नाणेघाट

उभे उत्तर : १.अपराध २.मानवता ३.नग ४.आसेतु हिमाचल ५.ताकद ६.धरा ७.नावडतीचे मीठ अळणी ८.पातळी ९.सांब १२.ममता १३.लतखोरा १६.क्षपणक १९.नीर २३.नाच २६.होयबा २७.अलंकार २८.कटकट २९.कलाकार ३१.लता ३३.कली ३६.सतत ३७.रमल ४०.दरम्यान ४३.आटपाट ४५.पेचकस ४७.सापत्नभाव ५०.नवथर ५१.मदतनीस ५२.द्रव्यहीन ५४.मकबरा ५५.काना ५६.मदन ५७.काहूर माजणे ६०.वरवर ६१.नजरकैद ६२.धरण ६५.जरा ६७.मचवा ६९अ.खारट ७१.सार ७२.खवा ७४.कर ७६.बघा

तळोजा कारागृहाचा संघ महाअंतिम फेरीत

कारागृहाच्या भिंतींत उमटले बंदिवानांचे सूर

। रसायनी । वार्ताहर ।
विविध गुन्ह्यांखाली तुरुंगात असलेल्या बंदिवानांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र कारागृह विभाग आणि शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बंदीजनांसाठी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय जगद्‌गुरू श्रीसंत तुकाराम महाराज भजन आणि अभंग स्पर्धेत तळोजासह कोल्हापूर, अमरावती, पुणे, नागपूर व नाशिक मध्यवर्ती कारागृह या संघांची प्राथमिक फेरीतून महाअंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. कारागृहातील भिंतींनाही या बंदिवानाच्या सुरांनी भारावून टाकल्याचे या स्पर्धेच्या निमित्ताने दिसून आले.

या स्पर्धेत राज्यातील २९ कारागृहांमधील बंदीजन सहभागी झाले होते. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. २९ संघांमधून अंतिम फेरीसाठी सहा संघांची निवड करण्यात आली आहे. स्पर्धेचा महाअंतिम सोहळा पुण्यात रंगणार आहे. बीड, वर्धा, अलिबाग, ठाणे आणि अहमदनगर जिल्हा कारागृह या संघांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. तर, स्पर्धेत सहभागी बंदीजनांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तळोजा कारागृहात बंदींना संगीत

शिक्षक तुकाराम लोभी यांनी प्रशिक्षण दिले.

दरम्यान, महाअंतिम फेरीत दाखल झालेल्या तळोजा कारागृह व उत्तेजनार्थ पारितोषिक जाहीर झालेल्या अलिबाग कारागृह या दोन्ही कारागृहात समन्वय साधण्याचे काम प्रतिष्ठानचे जिल्हा सचिव पत्रकार राकेश खराडे यांनी पाहिले होते. महाअंतिम स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्या संघास ज्ञानोबा-तुकोबा महाकरंडक आणि प्रमाणपत्र, द्वितीय संघास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाकरंडक व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांकास संत शेख महंमद महाकरंडक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

महाअंतिम फेरीत तळोजा संघ दाखल झाल्याने संगीत शिक्षक तुकाराम लोभी महाराज, माजी सरपंच संदीप मुंढे व प्रतिष्ठानचे जिल्हा सचिव पत्रकार राकेश खराडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया, उपाध्यक्ष नंदकुमार बंड, संदीप राक्षे, मोहन लबडे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. निवड झालेल्या महाअंतिम फेरीतील कारागृहांची स्पर्धा लवकरच होणार असल्याचे समजते.

निवडक

त्वचा रोगावर इलाज यंत्र

पनवेल : रा.स्व.संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयात त्वचेवरील पांढरे डाग व सोयरासीसवर उपयुक्त इलाज यंत्र श्वेता असोसिएशनचे विश्वस्त श्रीराम तुळपुळे व श्रीकांत चाफळकर यांनी दिले आहे. या यंत्राचे डॉ. गिरीष गुणे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी श्रीकांत चाफळकर, पटवर्धन रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र इनामदार, उपाध्यक्षा डॉ. कीर्ती समुद्र, राजीव समेळ, डॉ. भक्ती सारंग आदी उपस्थित होते.

मोफत दंततपासणी शिबीर

पनवेल : मोरया क्लिनिकच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त डॉ. आशिष बांदेकर व डॉ. तन्वी बांदेकरांनी सुकापूर पनवेल परिसरातील सर्व नागरिकांसाठी मोफत दंततपासणी शिबीर ठेवले होते. दिवसभरात ८० ते ९० जणांनी उपचार करून घेतले. यावेळी पाली-देवद सूकापुरचे सरपंच योगिता पाटील, शेकापचे राजेश केणी, ॲड. चेतन केणी, जयवंत खूजे, परेश घरत यांची मोलाची साथ लाभली.

गाड्यांचे इंजिन पार्ट चोरीला

पनवेल : तळोजा परिसरात एक अज्ञात चोराने एकाच रात्री तब्बल १३ व्हॅगनार गाड्यांमधील इंजिन पार्ट चोरून नेले आहेत. प्रत्येकी किंमत ५००० प्रमाणे ७०,००० रुपयांचे पार्ट चोरले लंपास केले आहेत. इरफान मैफूज शेख (४३, तळोजा फेज-०१) यांची मारूती व्हॅगनार तसेच तसेच तळोजा फेज-०१ व फेज-०२ परिसरामध्ये असलेल्या १३ मारुती व्हॅगनार गाड्यांमधील इंजिन पार्ट अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहेत.

१८ वर्षीय तरुणी बेपत्ता

पनवेल : पनवेल शहरातील एक १८ वर्षीय तरुणी कोणास काही एक न सांगता कोठेतरी निघून गेली आहे. ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मानसी कालोर (१८, रा. यशवर्धन सोसायटी गावदेवी मंदिर, पनवेल) असे या तरुणीचे नाव आहे. या तरूणीबाबत कोणास काही माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कॅलेंडरचे प्रकाशन

पनवेल : पोलीस पाटील संघांच्यावतीने २०२३ सालचे कॅलेंडर प्रकाशन पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर व तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाचे सचिव कुणाल लोंढे, पोलीस पाटील संघाचे पनवेल अध्यक्ष मिलिंद पोपेटा, उपाध्यक्ष संतोष गायकर यांच्यासह संघाचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

उल्हास नदीला गृहप्रकल्पांचा विळखा

बांधकामासाठी बिनधास्त पाणीउपसा; पाटबंधारे विभागाला तक्रारीची प्रतीक्षा

। नेरळ । वार्ताहर ।
रायगड, ठाणे जिल्ह्याची तहान भागवत उल्हास नदी ही पुढे खाडीला मिळते. या दोन्ही जिल्ह्यांतून बारमाही ही नदी वाहात असल्याने लाखो कुटुंबांची ती जीवनदायिनी आहे. तर शेकडो पाणी योजना या नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र, नेरळ भागात नदीच्या परिसरात उभे राहणारे मोठमोठे गृहप्रकल्प यांचा विळखा नदीला पडलेला असल्याचे चित्र आहे.

परिणामी, एका बाजूला बांधकामासाठी बिनदिक्कत पाण्याचा बेसुमार वापर या गृहप्रकल्पात बघायला मिळत आहे. तर दुसरीकडे नदीच्या पाणी पातळीमध्ये घट झाल्याने नेरळ कर्जतसारख्या शहरांवर पाणी टंचाईचे संकट ओढवले आहे. दरम्यान, यावर नियंत्रण ठेवणारा पाटबंधारे विभाग मात्र तक्रारीची प्रतीक्षा करत आपले हात झटकण्याचे काम करत आहे.

पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील राजमाची परिसरातील तुंगार्ली धरणातून उल्हास नदीचा उगम होतो. धरणापासून ३ कि.मी. अंतरावर नदीवर खंडाळा येथे भारतातील १४व्या क्रमांकाचा प्रसिद्ध कुणे धबधबा आहे. पुढे ही नदी रायगड जिल्ह्यात कोंडिवडे, खांडपे, तमनाथ कर्जत, नेरळ, कोदिवले, दहीवली, बिरदोले, शेलू ही प्रमुख गावे व शहरांतून वाहात जाऊन पाषाणे येथून ठाणे जिल्ह्यात प्रवेश करते. या नदीमध्ये टाटा विद्युत केंद्रासाठी वापरले

जाणारे पाणी सोडले जाते. त्यामुळे ही नदी बारही महिने वाहत असते. त्यामुळे शेकडो पाणी योजना या नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. नेरळ दहिवलीच्या पुढे धामोते-ममदापुर भागातून नदीचा प्रवाह जात असताना त्याबाजूला अनेक गृहप्रकल्प उभे राहिले आहेत, राहात आहेत. अशात बांधकामासाठी नदीच्या पाण्याचा वापर केला जात आहे. तर गृहप्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देखील नदीतून थेट पाईपलाईन टाकून पाणी उपसा केला जात आहे. अशा अनेक पाईपलाईन आणि मोटार उल्हास नदीत टाकण्यात आल्याचे चित्र आहे. तर यासाठी कोणतीही शासकीय परवानगी न घेता हा स्वतःच्या मर्जीचा उद्योग बांधकाम व्यावसायिक करीत आहेत.

नुकतेच नेरळ ग्रामपंचायत हद्दीत नाडीची पाणी पातळी घटल्याने पाणीटंचाईचे संकट ओढवले होते. मात्र, दुसऱ्या बाजूला बिल्डर लॉबी मात्र बिनदिक्कत पाण्याचा वापर करताना दिसत आहे. तेव्हा यावर अंकुश कुणाचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा आता तरी शासनाच्या पाटबंधारे विभागाला जाग येणार का? याकडे पाहणे उत्सुक्याचे ठरणार आहे.

आम्ही गृहप्रकल्पाला पाणी नदीतून उचलण्याची परवानगी देतो. त्यासाठी शासकीय रक्कम आकारली जाते. ते बिल संबंधितांकडून महिन्याला अदा करुन घेतले जाते. मात्र, धामोते, भागात आम्ही कोणत्याही गृहप्रकल्पाला, बांधकामासाठी किंवा पिण्यासाठी पाणी घेण्याची परवानगी दिली नाही. तरी कुणी अनधिकृतपणे पाणी उचलत असेल आणि असा प्रकार आढळून आल्यास संबंधिताला नोटीस देऊन दंडाची तरतूद आहे ती करू.
– भरत गुंटूरकर, उपअभियंता पाटबंधारे उपविभाग, कर्जत

जंगलाची सुरक्षा रामभरोसे

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यात डोंगराना प्रचंड लावण्यात आलेल्या वणव्यामुळे रोहा तालुक्यातील डोंगर अक्षरशः होरपळत आहे. तर सततच्या वणव्यामुळे वनसंपदेची मोठी हानी होत आहे. सध्याच्या आधुनिकेतेच्या व तंत्रज्ञानाच्या जीवनात औद्योगिकीकरण व नागरीकरणाच्या नावाखाली जंगलेच्या जंगले भुईसपाट होताना दिसत आहे. मात्र, या गंभीर बाबीकडे वनविभागने दुर्लक्ष होताना दिसत आहे.

दरम्यान, रोज कुठे ना कुठे तरी आग लावण्याचे प्रकार घडत असल्यामुळे त्यात अधिक भर पडत आहे. शिकार करणे, वृक्षतोड करणे, वनसंपदा मिळवणे यासाठी वणवे लावले जात असूनही वानखाते मात्र निद्रावस्थेत आहे, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

रोहा तालुक्यातील खांब, कोलाड, देवकान्हे, निवी, तळवली, लाढर, ताबंडी मेढा, जंगल परिसरात भरदुपारी वणवा लागून मोठ्या प्रमाणात वनराई जळून खाक झाली आहे.

रोहा तालुक्यातील विपुल वनसंपदा लाभलेल्या डोंगरांना लावण्यात आलेल्या आगीमुळे वनसंपदे बरोबरच प्राणी, पशु-पक्षी यांच्या वास्तव्यावर गदा येत आहे. एवढे सगळे होत असताना वनखाते मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहे, याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे.

उपसरपंचपदी शरद देशमुख

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या उपसरपंच पदावर शरद गणपत देशमुख यांची निवड झाली आहे. माणगाव तर्फे वरेडी मध्ये उपसरपंच पदाची निवडणूक झाली. त्यासाठी पिठासिन अधिकारी ग्रामपंचायतचे थेट सरपंच कल्याणी कराळे यांच्याकडे निर्धारित वेळेत शरद देशमुख यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता.त्यामुळे विशेष सभेत उपसरपंच म्हणून शरद देशमुख यांची बिनविरोध निवड झाली. त्या सभेला तानाजी टोकरे, रामदास हिलाल, जयेंद्र कराळे, यशवंत हिलम, शोभा घारे, नयना गायकवाड, निकीता कराळे, कल्पना पारधी, मंदा कराळे आदी सर्व सदस्य उपस्थित होते.या निवडणुकीत पिठासीन अधिकारी कल्याणी कराळे यांना ग्रामविकास अधिकारी शरदचंद्र पवार यांनी सहकार्य केले.

ग्रामपंचायत कर्मचारी भरती ज्येष्ठतानुसार : मंगेश म्हात्रे

। नागोठणे । वार्ताहर ।

रायगड जिल्हा ग्रामपंचायत संघटनेने केलेल्या सतत पाठपुराव्याला यश आले असून, लवकरच रायगड जिल्हा परिषदमध्ये दहा टक्के ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची नोकर भरती होणार आहे. ही नोकर भरती ज्येष्ठता यादीनुसार होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे यांनी दिली.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी सुधारित किमान वेतन, राहणीमान भत्ता व रजेसंदर्भात नागोठणेजवळील पिगोंडे ग्रामपंचायत कार्यालयात नुकतीच रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेची बैठक पार पडली. त्यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना मंगेश म्हात्रे बोलत होते. यामुळे सेवा ज्येष्ठतेच्या यादीत येणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. यावेळी पिगोंडे सरपंच संतोष कोळी, उपसरपंच कांचन माळी, सखाराम घासे, धनाजी पारंगे, कुसुम बावकर, ग्रामसेवक विजय आहिरे, ग्रामपंचायत संघटनेचे उपाध्यक्ष गोविंद म्हात्रे आदी उपस्थित होते.

उरणची जलवाहतूक समस्यांच्या गर्तेत

। चिरनेर । वार्ताहर ।

भूपृष्ठ वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी केंद्र सरकारने जलवाहतुकीला प्राधान्य दिले आहे. देशात जलवाहतूक वाढविण्यासाठी केंद्र सरकार नवनवीन योजना राबवत आहे. मात्र, उरण तालुक्यात वर्षानुवर्षे सुरू असलेल्या जलवाहतुकीला समस्यांचे ग्रहण लागले असून, या जलवाहतुकीत प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत.

उरण तालुक्यात मोरा ते भाऊचा धक्का, करंजा ते रेवस तर जेएनपीटी ते गेटवे ऑफ इंडिया अशी प्रवासी जलवाहतूक सेवा सुरू आहे. या तिन्ही ठिकाणावरून हजारो प्रवासी ये-जा करीत असतात. यापैकी मोरा ते भाऊचा धक्का आणि करंजा ते रेवस ही सेवा कित्येक वर्षांपासून सुरू आहे. या जलवाहतुकीमुळे उरणकरांना मुंबई आणि जिल्ह्याचे ठिकाण अलिबाग हे अंतर जवळचे

झाले आहे. सध्या या दोन जलवाहतूक सेवा समस्यांच्या गर्तेत सापडल्या असून, मेरीटाईम मंडळाचे आणि प्रशासनाचे प्रवाशांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

करंजा आणि मोरा बंदरात ज्या ठिकाणी बोटी लागतात त्या ठिकाणी जेटीवर प्रचंड प्रमाणात गाळ साचल्यामुळे ओटीच्या वेळी होड्या धक्क्यावर लावता येत नाही. धक्क्याच्या परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणात गाळ आहे की, कधी कधी या बोटी समुद्राच्या मध्यात थांबविण्याची नामुष्की मच्छिमारांवर येते. करंजा येथील नव्याने झालेल्या बंदराच्या भरावाचा आणि रो रो सेवेच्या भरावाचा गाळ

करंजा-रेवस ही सेवा उरणकरांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मात्र, या बंदरात गाळाची समस्या नेहमी प्रवाशांना सतावत असते .येथे प्रवाशांच्या सोयीसाठी असलेल्या शौचालयाच्या जागांवर काही स्थानिकांनी अतिक्रमण केले असल्यामुळे महिलावर्गाचे मोठे हाल होतात. निवाराशेड नसल्यामुळे प्रवाशांना ऊन पावसात उभे राहून बोटीची वाट पाहावी लागते.
- हेमंत गौरीकर, माजी संचालक, करंजा मच्छिमार सोसायटी

येथे साचला असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. हा गाळ काढण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे टेंडर दरवर्षी काढण्यात येते. मात्र, हा काढलेला गाळ पुन्हा याच ठिकाणी आणून टाकला जातो. जेएनपीटीच्या चौथ्या बंदराच्या भरावामुळे चिखल आणि गाळ साचलेला आहे.

'सुरक्षितता जीवनाचा मार्ग'

। शिहू । वार्ताहर ।

सुरक्षितता ही फक्त घोषणा नाही, तर जीवनाचा मार्ग आहे, असे प्रतिपादन वेलशेत दूरक्षेत्र प्रभारी अधिकारी प्रमोद कदम यांनी केले. रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्ताने दि. १८ जानेवारी रोजी नागोठणे पोलीस ठाण्यांतर्गत रिलायन्स फाऊंडेशन स्कूल मराठी माध्यम येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक योगेश परचुरे, रिलायन्सचे उपमहाव्यवस्थापक अजिंक्य पाटील, वाहतूक पोलीस अधिकारी रमेश पाटील आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

मेंगाळवाडीची पाण्यासाठीची वणवण थांबणार

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यात आदिवासी दुर्गम भाग मोठ्या प्रमाणात आहे. या भागातपाण्याचेदेखीलदुर्भिक्ष्य आहे. तालुक्यातील खांडस ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या मेंगळवाडीची परिस्थिती देखील यापेक्षा वेगळी नाही. भरपावसाळ्यातसुद्धा येथील आदिवासी बांधवांना खड्ड्यांतून पाणी पिण्याची वेळ येते. ही समस्या लक्षात घेऊन नेरळ येथील शिक्षक रवी काजळे यांनी ही बाब रोटरी क्लबच्या निदर्शनास आणून

दिल्याने रोटरी क्लबने याठिकाणी बोअरवेल मंजूर केली आहे. त्यामुळे मेंगळवाडीच्या आदिवासी बांधवांची पाण्यासाठीची वणवण थांबणार आहे.

तालुक्यातील खांडस ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या मेंगाळवाडीतील आदिवासी बांधवाना आजही पाण्यासाठी वणवण करावी लागते. साधारण ३० ते ३५ घरांची वस्ती असलेल्या मेंगाळवाडीत १०० ते १२५ लोक राहतात. वाडीसाठी २ विहिरी आहेत. मात्र वाडीपासून विहिरींचे अंतर खूप आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण तर करावी लागतेच पण सोबत पावसाळ्यातदेखील परिस्थिती वेगळी नाही. पावसाळ्यात पाण्यासाठी गावाजवळील डोंगराच्या कपारीत खड्डा करून ज्याला आदिवासी लोक डवरा म्हणतात त्यात पाणी साठवून ते पाणी वाडग किंवा छोट्या पातेल्याच्या सहाय्याने भांड्यात भरून ते पाणी पिण्यासाठी वापरले जाते. ही बाब शिक्षक रवी काजळे यांनी रोटरी क्लब यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानुसार रोटरी क्लब डोंबिवली सिटी सेक्रेटरी सविता नाझरे, प्रोजेक्ट हेड मंदार, विजय नाझरे, शिक्षक रवी काजळे यांनी नुकतीच वाडीत येऊन पाहणी केली. येथील परिस्थिती पाहता तात्काळ या योजनेस मंजुरी दिली. तर बोअरवेल मारण्याच्या कामास लवकरच सुरुवात केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, घटस्फोटित विधुर, विधवा सर्वजातीय स्थळांसाठी रोहा-गणेश महाकाळ -८८८८९३५७७५
- Kitty, Family, College & Office Party Destination for, overnite stay at Alibag. Budget per head per day Rs.2250 to Rs. 5500 stay, Food & With/Without Transfer. Contact : The Banyan Shelters. 9850427728, 9822257929
- ओनेस्ट् ग्रूप ऑफ होटेल्स बारशिव व चिकनी येथे ऑलराउंडर शेफ, माळी त्वरित नेमणे आहे. जेवणाची व रहायची सोय. संपर्क - ९४०५७५३९१९
- ऑटोकॅड, इन्टीरिअर डिझायनिंग, कॉम्पुटर Programing शिकण्यासाठी विश्वसनीय संस्था कॉलेज ऑफ आय.आय.टी.अलिबाग. मुंबई ठाणे, अलिबाग येथे ऑटोकॅड, इन्टीरिअर डिझायनिंग साठी Vacancy उपलब्ध आहेत. कॉलेज ऑफ आय.आय.टी.अलिबाग येथे ऑटोकॅड 2D, 3D, इन्टीरिअर डिझायनिंगचे क्लासेस चालू आहेत, त्वरित प्रवेश घ्या. पात्रता १२ वी पास कोणतीही शाखा, Civil, Mechanical Draughtsman, Civil, Mechanical Diploma. प्रवेश चालू आहेत.
  * ऑटोकॅड 2D, 3D,इन्टीरिअर डिझायनिंग
  C and C++, C#, Advance Java, HTML, Vb.(Dot) Net, ASP.(Dot) Net. DTP, Tally * 100% job Assistance.
- अलिबाग गुजराती महाजन हॉल बाजारपेठ अलिबाग हॉल भाड्याने देणे आहे. संपर्क : ९९२२५६७६५७, ८००७७७८८४९.
- नागाव येथील नवीन हॉटेलमध्ये कामासाठी अनुभव असल्यांनी फोन करावा : ८४०८८२९५५५

हॉटेल मॅनेजर	१
रेस्टॉरंट मॅनेजर	१
ऑल राऊंडर कूक	२
किचन हेल्पर	३
नाश्ता बनवणारा कूक	१
किचन मोरीवाला	१
वेटर (जेवण वाढणारा)	३
फ्रंट ऑफिस मुले	२
हाऊसकिपिंगसाठी लेडीज	२

- अलिबागमधील कपड्याचे दुकान बंद केल्यामुळे सर्व स्टॉक होलसेल रेटमध्ये देणे आहे. संपर्क : ९४२२६९६२३५
- रिसेप्शनसाठी मुलगा/मुलगी पाहिजे. अलिबाग, पेझारीसाठी मो. ९९२१०७३९६३

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

उरण शेकापचा स्तुत्य उपक्रम

विधवांना मिळाला हळदीकुंकवाचा मान

। उरण । वार्ताहर ।
शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने मोरेश्वर भोईर यांच्या पुढाकारातून उरण डाऊरनगर येथील आदिवासी वाडीवरील विधवा महिलांचा हळदीकुंकू देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम एसटी स्टँडच्या ऑफिसजवळ आयोजित करण्यात आला होता.

मोरेश्वर भोईर यांच्या पुढाकाराने कार्यक्रम

यावेळी मार्गदर्शन करताना मोरेश्वर भोईर म्हणाले की, गेली पाच वर्षे हा विधवा महिलांसाठी कार्यक्रम करीत आहोत. विधवा स्त्रियांना समाजात मनाचे स्थान मिळाले पाहिजे, त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी शेकाप नेहमीच कटिबद्ध आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सीमा घरत, तर प्रमुख पाहुणे म्हणून शहर चिटणीस शेखर पाटील, कामगार नेते नयन म्हात्रे, सहचिटणीस यशवंत ठाकूर, चाणजे माजी उपसरपंच प्रदीप नाखवा, पदाधिकारी शंकर भोईर, शहर अध्यक्षा नयना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ७५ विधवा आदिवासी महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. सर्व महिलांना सहावारी व नऊवारी साडी वाटप करण्यात आले. तसेच वुमनमन क्लबच्या वतीने तिळगुळ वाटप करण्यात आले. यावेळी महिलांना शासकीय योजनांची माहिती नयन म्हात्रे यांनी दिली.

आपण विधवा असलात तरी मनात शंका आणू नये, आपण या देवाच्या लेकी आहोत, आपण रोज सकाळी देवाला हळदीकुंकू लावतो, मग अशाप्रसंगी, अशा समारंभात आपण सहभागी झाले पाहिजे, तसेच लेक लाडकी अभियानांतर्गत ही बालवाडीच्या शिक्षिका करुणा घरत यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाचे नियोजन मनीष कातकरी, लहू शिंदे, मुकरी यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामचंद्र म्हात्रे यांनी केले.

जखमी फ्लेमिंगो वनविभागाच्या स्वाधीन

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील मोरा भवरा परिसरातील स्थानिक मच्छिमारांनी जखमी फ्लेमिंगो पक्ष्याला उरण वनविभागाच्या स्वाधीन केले आहे. दरम्यान, समुद्राच्या किनाऱ्यावर हा फ्लेमिंगो चालत असताना मच्छिमारांना दिसला.

मात्र, त्याला उडता येत नसल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी पक्षीमित्र रघुनाथ नागवेकर यांच्याशी संपर्क साधत त्याला याविषयी माहिती दिली. त्यांनी तात्काळ घटनास्थळी येऊन त्याला वनविभाच्या स्वाधीन केले.या फ्लेमिंगोच्या दोन्ही पंखांना जखम झाल्यामुळे त्याला उडता येत नव्हते, याची माहिती वनविभागाला देण्यात आली.

त्यानंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी या पक्ष्याला ऐरोली नवी मुंबई येथे नेण्यात येणार असल्याचे सांगितले. पक्षीमित्रांनी याबद्दल समाधान व्यक्त केले. पक्ष्यांवर उपचार होतील असे उपचार केंद्र सुरू करण्याचे नियोजन आहे, असे पक्षीतज्ज्ञ सागर मिस्त्री यांनी यावेळी सांगितले.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक १.श्री.प्रदिप प्रभाकर गावंड, २.श्री.राजेंद्रनाथ सदाशिव पाटील यांच्याकडून माझे आशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे	पुर्वीची मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
केतकीचा मळा ता.अलिबाग जि.रायगड	पेढांबे गट नं. २५१(जुना सर्व्हे नं.२२/५)	४७	पो.ख.२-००-००	०.००

वर नमूद मिळकतीपैकी श्री.प्रदिप प्रभाकर गावंड, श्री.राजेंद्रनाथ सदाशिव पाटील यांच्या मालकीचे क्षेत्र ०-६०-०० हे.आर.ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशीर बाबींची पुर्तता करून माझे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १९/०१/२०२३
सही/-
अॅड.वैभव वसंत पाटील
नवेदर बेली, पो.कुरूळ,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा नं. ९८५०२६१००८

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही

खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणी, सर्व भार, दावे व मागण्या ज्या काही असतील, त्यांपासून मुक्त अशा मालमत्तेसंदर्भात नानजी दाना पटेल यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागाविरोधात वा संदर्भात विक्री, अभिहस्तांकन, गहाण, न्यास, धारणाधिकार, भेट, प्रभार, ताबा, उत्तराधिकार, भाडेकरार, वहिवाट, देखभाल, सुविधाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित समजण्यात येतील.

वरील संदर्भित अनुसूची

पुढील विवरणीत रिक्त जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड खालील सर्व्हे क्र., हिस्सा क्र. व क्षेत्राचे.

सर्व्हे क्र.	हिस्सा क्र.	क्षेत्र हेक्टर आर	पोट खराबा क्षेत्र हेक्टर आर	पत्ता
३६	-	०.४५.००	०.१३.७०	गाव तळोजे मजकूर तालुका पनवेल, जिल्हा रायगड.
४१	२/२	०.७१.३०	०.०३.५०	गाव तळोजे मजकूर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड
४२	३सी	०.३६.१०	०.००.००	गाव करवले बुद्रुक,तालुका पनवेल, जिल्हा रायगड.

मुंबई, दि. २० जानेवारी, २०२३

जेसन वाज
भागीदार
पी वाज अॅन्ड कं.
वकील व सॉलिसिटर्स
ए/१, लिबर्टी, १ ला मजला, ९८-बी, हिल रोड, वांद्रे,
मुंबई - ४०० ०५०.
ई-मेल : pvas1979@gmail.com

अर्जदाराचे वकील
अॅड.मोहनिश मनोहर ठाकूर

जाहीर नोटीस

मुरूड येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो., यांचे न्यायालयांत.

क्रि.चौ.अर्ज.३/२०२३
नि.नं. ७/ड

शशिकला शशिकांत महाडीक, अर्जदार
विरूद्ध
मा.ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत भोईघर, सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा मुलगा सिद्धेश शशिकांत महाडीक याचा जन्म दि.२९/०८/१९९५ रोजी मौजे बारशिव, मुरूड-जंजिरा जि.रायगड येथे झालेला असून त्यांची जन्म नोंद ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत भोईघर यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मा.मुरूड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अॅण्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखला केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा मुलगा सिद्धेश शशिकांत महाडीक याचा जन्म दि.२९/०८/१९९५ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.१६/०२/२०२३ रोजी समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचा मुलगा सिद्धेश शशिकांत महाडीक याची जन्म नोंद जन्म -मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागाहुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-		सही/-
कनिष्ठ लिपिक फौजदारी न्यायालय मुरूड	**कोर्टाचा शिक्का**	**सहाय्यक अधिक्षक फौजदारी न्यायालय मुरूड**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे महाळूंगे खुर्द, ता.मुरूड जि.रायगड येथील भुमापन क्रमांक ११३ एकूण क्षेत्र ००-४४-०० हे.आर.आकार ०० रूपये ४० पैसे ही मिळकत मिळकतीचे विद्यमान कब्जेदार श्री इराण्णा आयण्णा औजाण्णा यांचे खुद्द मालकीची व ताबा कब्जा वहिवाटीची असून सदर मिळकतीपैकी उत्तर पुर्व दिशेकडील ००-०६-०० हे.आर., ही मिळकत व त्यात असलेले घर ही मिळकत माझे अशिलांनी मिळकतीचे सदर विद्यमान कब्जेदार यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार माझे अशिल व मिळकतीचे विद्यमान कब्जेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकतीची मालकी व ताबा कब्जा विद्यमान कब्जेदार यांचाच आहे असा भरवसा त्यांनी माझे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करण्णर 'खरेदीदार तर्फे अॅडव्होकेट' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास श्री इराण्णा आयण्णा औजाण्णा यांचाच आहे असे समजून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता.१८/०१/२०२३
अॅड. श्रध्दा प्रदिप वैद्य
'नागेश्वरभुवन' गणपती आळी,
मु.पो.नागांव, ता.अलिबाग जि.रायगड
(खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट)

जाहीर निविदा सुचना

आमच्या वरील नावाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अे, बी व सी या तिन्ही विंगच्या संपुर्ण छतावर नवीन पत्रे बसविण्याकामी, सदर कामाचा अनुभव असणाऱ्या इच्छुक निविदा धारकांकडून, सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा या अध्यक्ष, वसंत पुष्प अॅनेक्स सह गृहनिर्माण संस्था मर्या., अलिबाग यांचे नावे दि.२७/०१/२०२३ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात पोच कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या निविदांचा स्विकार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कोणतेही कारण न देता कमी अथवा जास्त दराची कोणतीही संपुर्ण निविदा, अथवा निविदेतील भाग स्वीकारले अथवा नाकारण्याचा हक्क संस्थेने राखुन ठेवला आहे.

टीप : निविदा धारकांना सदर इमारतीची पाहणी सकाळी ११ ते १२ वाजता मा.अध्यक्ष/सचिव यांचे परवानगीने करता येईल. निविदेसोबत आपण केलेल्या कामाचा संदर्भ जोडावा.

वसंतपुष्प अॅनेक्स सह.गृहनिर्माण
संस्था मर्या, जुन्या नगरपालिके ईमारती
शेजारी कामत आळी, अलिबाग

वसंत पुष्प अॅनेक्स सह.गृहनिर्माण संस्था मर्या.

सही/-	सही/-	सही/-
खजिनदार	**सचिव**	**अध्यक्ष**

अर्जदाराचे वकील
अॅड.मोहनिश मनोहर ठाकूर

जाहीर नोटीस

मुरूड येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो., यांचे न्यायालयांत.

क्रि.चौ.अर्ज.०४/२०२३
नि.नं. ७/ड

शशिकला शशिकांत महाडीक, अर्जदार
विरूद्ध
मा.ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत भोईघर, सामनेवाला

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा मुलगा प्रथमेश शशिकांत महाडीक याचा जन्म दि.२९/०८/१९९५ रोजी मौजे बारशिव, मुरूड-जंजिरा जि.रायगड येथे झालेला असून त्यांची जन्म नोंद ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत भोईघर यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मा.मुरूड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज अॅण्ड डेथ अॅक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखला केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा मुलगा प्रथमेश शशिकांत महाडीक याचा जन्म दि.२९/०८/१९९५ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दि.१६/०२/२०२३ रोजी समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांना त्यांचा मुलगा प्रथमेश शशिकांत महाडीक याची जन्म नोंद जन्म -मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागाहुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-		सही/-
कनिष्ठ लिपिक फौजदारी न्यायालय मुरूड	**कोर्टाचा शिक्का**	**सहाय्यक अधिक्षक फौजदारी न्यायालय मुरूड**

जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.भावेश कुमार जैन यांनी खाली नमूद केलेली शेत जमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री.सुरज हरिभाऊ भोईर यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भूमापन क्र.व उपविभाग	एकूण क्षेत्रफळ (हे.आर.प)	आकार (रू.पै.)
मौजे-मांडवणे ता.कर्जत जि.रायगड	४३/४	०-५३-००	०.३०

वरील वर्णनाच्या शेत जमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व अन्य हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १९/१/२०२३
अॅड.उमेश आनंद भगत
(अधिवक्ता)
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी मे.गोका इंजिनिअरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, यांचे मालकीचा मौजे वरचीवाडी, ता.माणगांव, जि.रायगड येथील सर्वे नं.१११/बी (जुने सर्वे नं.१११/७+१११/८+१११/९अे+१११/१०+१११/१२) या मिळकतीतील बिनशेती भूखंड क्र.४ क्षेत्र ७८० चौ.मी.(८३९६ चौ.फूट) आकार ७८ (रू.पैसे) हा बिनशेती भूखंड कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे व सदर मालकांनी सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्रीही दिली आहे. तरी सर्व लोकांस या नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत, वर नमूद विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपली हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : १८.०१.२०२३
(अॅड.सुरेंद्र नारायण जोशी)
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड
अलिबाग, जिल्हा रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे.हुमगाव ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक रवी सारंगन व संजय श्रीनिवासन यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन
मौजे.हुमगाव ता.कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
५५	३	२-४५-०० यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीच्या १-३५-०० क्षेत्रापैकी ०-३८-०० इतके विकत दिलेले क्षेत्र	१-३७

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
ता.२०/०१/२०२३
मो.नं.९९२१७२२२००
खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
अॅड.समीर हरिश्चंद्र लाड
शॉप नं.५अ, वृंदावन कॉम्प्लेक्स,
मुद्रे, ता.कर्जत जि.रायगड

त्वरीत पाहिजेत

रिसेप्शनिस्ट - १ पुरूष/ महिला कॉम्प्युटरचे नॉलेज टॅली, डी.टी.पी (Tally, D.T.P.)
हाउस किपर - १ पुरूष अनुभवी व्यक्तिला प्राधान्य
हॉटेल शिवराय-म्हाडा कॉलनी-पेण
मो.नंबर- ९२७३३०८२८३

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही

खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणी, सर्व भार, दावे व मागण्या ज्या काही असतील, त्यांपासून मुक्त अशा मालमत्तेसंदर्भात १. दिलीप नानजी पटेल व २. भरत नानजी पटेल यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागाविरोधात वा संदर्भात विक्री, अभिहस्तांकन, गहाण, न्यास, धारणाधिकार, भेट, प्रभार, ताबा, उत्तराधिकार, भाडेकरार, वहिवाट, देखभाल, सुविधाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा असे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित समजण्यात येतील.

वरील संदर्भित अनुसूची

पुढील विवरणीत रिक्त जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गाव करवले बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील, खालील सर्व्हे क्र., हिस्सा क्र. व क्षेत्राचे.

सर्व्हे क्र.	हिस्सा क्र.	क्षेत्र हेक्टर आर	पोट खराबा क्षेत्र हेक्टर आर
१०४	३	०.२८.८०	०.००.८०

मुंबई, दि. २० जानेवारी, २०२३

जेसन वाज
भागीदार
पी वाज अॅन्ड कं.
वकील व सॉलिसिटर्स
ए/१, लिबर्टी, १ ला मजला, ९८-बी, हिल रोड, वांद्रे,
मुंबई - ४०० ०५०.
ई-मेल : pvas1979@gmail.com

वादीतर्फे वकील- श्री.सुरेंद्र नारायण जोशी,
नि.नं.७/ड

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात,

रेग्युलर मुकदमा नं.३७/२०१९

श्री.चंद्रशेखर काशिनाथ लिमये अर्जदार
विरूद्ध
श्रीमती इंदिराबाई वासुदेव प्रधान, (मयत) व इतर, प्रतिवादी

ज्याअर्थी, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरूद्ध मालकीच्या अलिबाग नगरपालिका हद्दीतील सिटी सर्वे नं.६६७/१अ/३ या मिळकतीतील घर नं.११६५ मधील प्रतिवादीचे ताब्यातील पूर्व दिशेकडील २ क्रमांकाच्या भाड्याच्या खोलीसंदर्भात ताबा मिळणेसाठी या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी ही दावा दाखल करणेपूर्वी मयत असल्याने व तिला जवळचे कोणीही नातेवाईक नसल्याने वादीने सदर दाव्यामध्ये नि.६ कडे अर्ज करून दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम २२ नियम ४ अ अन्वये योग्य ती कार्यवाही करून, प्रतिवादीच्या वतीने प्रस्तुतचा दावा चालविणेसाठी कायदेशीर प्रतिनिधी म्हणून महाप्रशासक किंवा न्यायालयाच्या एखादा अधिकारी किंवा मा.न्यायालयात योग्य वाटेल अशा व्यक्तीची नेमणूक करणेबाबत विनंती केली आहे. त्या अर्जावर न्यायालयाने जाहीर नोटीस प्रसिद्ध करणेबाबत आदेश केला आहे. सबब श्रीमती इंदिराबाई वासुदेव प्रधान यांचे मृत्यूपश्चात त्यांना कोणीही कायदेशीर प्रतिनिधी व/वा वारस असल्यास, त्या संबंधित व्यक्तीने नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक २३/१/२०२३ रोजी या न्यायालयात ठिक सकाळी ११.०० वा स्वतःअगर वकीलांमार्फत हजर राहून, योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात त्यांचे म्हणणे दाखल करावे. सदर मुदतीत कोणीही वारसाहक्क सांगणेस आले नाहीत, तर श्रीमती इंदिराबाई वासुदेव प्रधान यांना जवळचे कोणीही कायदेशीर प्रतिनिधी व/वा वारस नाहीत असे गृहित धरून पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. अशा वेळी मागाहून कोणाचीही, कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची देखील सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा.न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

अलिबाग
तारीख : १८.०१.२०२३

सही/-		सही/-
क.लिपिक दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, रायगड-अलिबाग	**कोर्टाचा शिक्का**	**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रायगड-अलिबाग**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-सोगाव, ता.अलिबाग, येथील गट नं.३०१/२, क्षेत्र ०-५१-०० हे.आर., पो.ख.०-००-०० हे.आर., एकूण क्षेत्र ०-५१-०० हे.आर., आकार ५.१० रू.पै. मिळकतीच्या विद्यमान मालक गुलचेर अर्देशिर इराणी यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १९/०१/२०२३
(अॅड.संजय द.म्हात्रे)
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड

प्रोसेस जमा
दि.
अर्जदाराचे वकील
श्री.राजेंद्र म.माळी

अलिबाग येथील मे.सि.ज.सि.डी.सो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१/२०२३
नि.७/ड

जाहीर नोटीस

श्रीमती. रचिता राजेश पेटकर अर्जदार
विरूध्द
कुणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार हिचे पती कै.राजेश शंकर पेटकर हे दि.२५/१०/२०२२ रोजी मयत झाले असून त्यास अर्जदार ही एकमेव कायेदशीर वारस आहे.

कै.राजेश शंकर पेटकर यांचे नावे रिक्षा नं.एम.एच.०६-झेड.३७२६ अशी होती. ती रिक्षा अर्जदार हिचे नांवे होणे करीता त्यांनी वारस दाखला मिळावा म्हणून या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना कै.राजेश शंकर पेटकर यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणाही व्यक्तीची, हरकत तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा १८/०३/२०२३ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै.राजेश शंकर पेटकर यांचे वारस म्हणून वारस दाखला (Heirship Certificate) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे.कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकूम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.१७ माहे, ०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/- (sd/-)		सही/- sd/-
लिपिक दिवाणी न्यायाधिश व स्तर अलिबाग	**कोर्टाचा शिक्का**	**अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग**

प्रो.जमा रू.५०/-
अर्जदारतर्फे अॅड.प्रशांत म्हात्रे

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मुख्य न्यायदंडाधिकारी सो.रायगड यांचे कोर्टात

क्रि.चौ.अर्ज २०९/२०२२

श्री.देवेंद्र भवरलाल परमार, अर्जदार
विरूध्द
ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हा वरील पत्त्यावर राहत असून अर्जदार हे मुंबई येथील रहिवाशी असून त्यांचा जन्म दिनांक ०६/०४/१९६९ रोजी मौजे पोयनाड येथे झालेला असून त्याबाबतची नोंद ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड यांच्या कार्यालयीन दप्तरी सन १९६९ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदरच्या जन्माची नोंद होण्याकरीता आदेश मिळविण्याकरीता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२२/०२/२०२३ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १६/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-		सही/-
कनिष्ठ लिपीक अलिबाग-रायगड	**कोर्टाचा शिक्का**	**सहाय्यक अधिक्षक मुख्य न्यायदंडाधिकारी**

प्रो.जमा रू.५०/-
अर्जदारतर्फे अॅड.प्रशांत म्हात्रे

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात

क्रि.चौ.अर्ज १९४/२०२१

श्री.दत्तात्रेय सहदेव पाटील, अर्जदार
विरूध्द
ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हा वरील पत्त्यावर राहत असून त्याची आई कै.रूक्मिणी सहदेव पाटील हे मौजे चिंचोटी येथील रहिवाशी असून तिचे निधन दिनांक २५/११/१९९४ रोजी मौजे चिंचोटी येथे झालेले असून त्याबाबतची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी यांच्या कार्यालयीन दप्तरी सन १९९४ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदरच्या मृत्यूची नोंद होण्याकरीता आदेश मिळविण्याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२२/०२/२०२३ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १६/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-		सही/-
कनिष्ठ लिपीक अलिबाग-रायगड	**कोर्टाचा शिक्का**	**सहाय्यक अधिक्षक मुख्य न्यायदंडाधिकारी**

Saraswati Education Society's
Rajesh Tasgaonkar School of Law
Dr.N.Y. Tasgaonkar Education Campus, At- Khanand-Karjat, Tal-Karjat, Dist-Raigad. PIN- 410201.
Website: www.tasgaonkartech.com Contact- 9673582530

FULL TIME FACULIY POSITIONS

Applications are invited from interested and eligible candidates for "LLB" (3 Years) and "LLB" (5 Years) w,e,f, from 2023-24 for following posts;

Sr.No.	Position	No of Positions
1	Principal	01
2	Assistant Professor	04
3	Librarian	01
4	Student Section Clerk	01

Qualification, Experience & API : As per the norms of BCI, Govt, of Maharashtra and University of Mumbai. Candidate with relevant teaching/ professional experience & ph.D.shall be preferred
Pay Scale : As per the norms of University of Mumbai & As per the service rules of SES.
How to apply : Apply within 10 days from the publishing of the advertisement. Send detailed resume, Colour photo & documents through mail on **ramakant.tare@tasgaonkartech.com**

sd.
Registrar

Saraswati Education Society's
Rajesh Tasgaonkar College of Arts, Commerce & Science
Dr.N.Y. Tasgaonkar Education Campus, At- Khanand-Karjat, Tal-Karjat, Dist-Raigad. PIN- 410201.
Website: www.tasgaonkartech.com
Contact- 9673582530

FULL TIME FACULIY POSITIONS

Applications are invited from interested and eligible candidates for our Arts, Commerce & Science College w,e,f, from 2023-24 for following posts;

Sr.No.	Position	No of Positions
1	Principal	01
2	Assistant Professor B.A. (B.A.-04) (Bachelor in Lib. & Info, Science-02) (Film Tele & New Media Prod.-02) (Multimedia & Mass Comm.-02)	10
3	Assistant Professor B.Com. (B.Com.-04) (Acco.& Finance-02) (Banking & Insu.-02) (B.M.S.-02) (Investment Mngmt.-02) (Financial Markets-02)	14
4	Assistant Professor B.Sc. (B.Sc.04) (Computer Science-02) (BSCIT-02) (Sports Management-02) (Data Science-02) (Skill Development -Animation-02)	14
5	Librarian	01
6	Student Section Clerk	01

Qualification, Experience & API : As per the norms of BCI, Govt, of Maharashtra and University of Mumbai. Candidate with relevant teaching/ professional experience & ph.D.shall be preferred
Pay Scale : As per the norms of University of Mumbai & As per the service rules of SES.
How to apply : Apply within 10 days from the publishing of the advertisement. Send detailed resume, Colour photo & documents through mail on **ramakant.tare@tasgaonkartech.com**

sd.
Registrar

निवडक

धावपटू दुती चंद निलंबित

नवी दिल्ली : भारताची स्टार महिला धावपटू दुती चंद हिला प्रतिबंधित पदार्थांचे सेवन केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. त्यानंतर तिच्यावर तात्पुरत्या निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. दुतीच्या डोपिंग चाचणीच्या रिपोर्टमध्ये अनेक प्रतिबंधित पदार्थ आढळून आल्यानंतर तिच्यावर ही कारवाई झाली आहे. मला याबाबत अद्याप काहीही माहिती नाही, अशी प्रतिक्रिया दुती चंदने दिली आहे.

भारत-पाक सामना अमेरिकेत?

नवी दिल्ली : टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या स्थळ तपासणी पथकाने ऑकलंड, फ्लोरिडा आणि लॉस एंजेलिससारख्या काही शहरांना भेट दिली. वास्तविक, पुढच्या वर्षीचा टी-२० विश्वचषक अमेरिका आणि वेस्ट इंडिज क्रिकेट संयुक्तपणे आयोजित करणार आहे. अमेरिका क्रिकेटचे अध्यक्ष अतुल राय यांनी ही माहिती दिली. दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना अमेरिकेत होऊ शकतो, अशी माहितीही राय यांनी दिली.

भारतीय महिला सुपर सिक्समध्ये

नवी दिल्ली : शेफाली वर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेत खेळल्या जात असलेल्या महिला टी२० विश्वचषकात विजयाची हॅट्ट्रिक केली आहे. मन्नत कश्यपने चार विकेट घेत स्कॉटलंडच्या बॅटिंग ऑर्डरचे कंबरडे मोडले. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने निर्धारित २० षटकांत ४ गडी गमावून १४९ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना स्कॉटिश संघ ६६ धावांत सर्वबाद झाला. या विजयासह भारतीय संघाने सुपर-६ मध्ये आपले स्थान पक्के केले आहे.

बॅडमिंटनपटूंकडून निराशा

नवी दिल्ली : भारतीय बॅडमिंटनपटूंना घरच्या मैदानावर निराशेचा सामना करावा लागला. किदांबी श्रीकांत, मालविका बन्सोड व आकर्षी कश्यप यांचा एकेरीत; तर अश्विनी भट- शिखा गौतम यांचा दुहेरीत पराभव झाला.किदांबी श्रीकांतला व्हिक्टर क्सेलसनकडून सरळ गेममध्ये पराभूत व्हावे लागले. तर, महिला एकेरीमध्ये महाराष्ट्राच्या मालविका बन्सोडला थायलंडच्या बुसानन ओंगबमरुंगफन हिने २१-१७ आणि २१-१२ असे सरळ सेटमध्ये पराभूत केले.

'७२ तासात उत्तर द्या'

नवी दिल्ली : महिला कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजप खासदार ब्रिजभूषण सिंह अनेक वर्षांपासून महिला कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण करत आहेत, असा आरोप केला. या आरोपानंतर खा. ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात दिल्लीत पैलवानांनी आदोलन केलं आहे. दरम्यान, या आरोपाचं गांभीर्य लक्षात घेऊन क्रीडा मंत्रालयाने कुस्तीगीर संघटनेला नोटीस पाठवून या आरोपांवर ७२ तासांत उत्तर देण्यास सांगितले आहेत.

राज्यात रायगड अव्वल

खेळाडूंकडून पदकांची लयलूट | १४ सुवर्ण, ३ रौप्य, ४ कांस्यपदकांची कमाई

। रसायनी । वार्ताहर । जिल्हा क्रीडा संकुल, अहमदनगर येथे तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित 'महाराष्ट्र राज्य पुमसे तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२२-२३' उत्साहात पार पडली. नवी मुंबई व रायगडच्या खेळाडूंनी २१ विविध गटांमध्ये रायगड जिल्ह्यातर्फे सहभाग घेतला होता. यामध्ये १४ सुवर्ण, ३ रौप्य व ४ कांस्य पदकांसह एकूण २१ पदके मिळवून १९३१ गुणांसह सांघिक विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध वयोगटातील सुमारे २४० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पुमसे स्पर्धेमध्ये सब-जुनिअर, कॅडेट, जुनियर व सीनियर अशा विविध वयोगटातील वैयक्तिक पुरुष व महिला, मिश्र जोडी तसेच सांघिक पुरुष व महिला असे एकूण ३३ गट असतात.

दरम्यान, स्वराली माटेकर हिने सब-जुनिअर वैयक्तिक मुली गटामध्ये सुवर्णपदक पटकावून स्पर्धेची सुरुवात केली, तर अमोल माळी यांनी ४० वर्षाखालील वैयक्तिक पुरुष गटामध्ये सुवर्णपदक घेऊन स्पर्धेची सांगता केली. या स्पर्धेत रोहित सिनलकर व प्रथम ठोंबरे यांनी प्रशिक्षक म्हणून, तर हुसेन शेख व निखिल ठुबे यांनी व्यवस्थापक म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली. यातील सुवर्णपदक विजेते खेळाडूंची अधिकृत राष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली असून, या स्पर्धेतून भारतीय संघाची निवड करण्यात येणार आहे.

प्रशिक्षक रोहित सिनलकर यांची १९ ते २१ जानेवारीदरम्यान नमक्कल, तामिळनाडू येथे होणाऱ्या राष्ट्रीय पुमसे तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धा २०२२-२३ साठी महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आहे.

सर्व खेळाडूंना राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक तुषार तानाजी सिनलकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. नवी मुंबई महानगरपालिका महापौर जयवंत सुतार तसेच पनवेल नगरसेविका दर्शना भोईर, नवी मुंबई मनपा विस्तार अधिकारी सुलभा बारघरे, मनपा मुख्याध्यापक मारुती गवळी, अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन ऑफ रायगडच्या अध्यक्षा ॲड. प्रज्ञा भगत, सचिव सचिन माळी, उपाध्यक्ष संजय भोईर, खजिनदार रोहित सिनलकर इत्यादी मान्यवरांनी संघाचे अभिनंदन केले, तसेच विजेत्या खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

रायगडचे खेळाडू 'पॉवर'फुल

तीन सुवर्ण, एका रौप्यपदाकची कमाई

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

संभाजी नगर येथील गारखेडा येथे विभागीय क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग बेंच प्रेस स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघातून रायगडच्या खेळाडूंनी ज्युनिअर, सिनियर आणि मास्टर स्पर्धेत सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी तीन सुवर्ण व एका रौप्यपदकाची कमाई केली आहे.

यामध्ये कुणाल पिंगळे (ज्युनिअर, सुवर्णपदक), दिनेश पवार (मास्टर, सुवर्णपदक), अक्षय शंनमुगम (सिनिअर, सुवर्णपदक), संतोष गावडे (मास्टर, रौप्यपदक) यांनी पदके पटकावली आहेत. या खेळाडूंच्या यशाबद्दल रायगड पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर तसेच या खेळातील मान्यवर सचिन भालेराव, राहुल गजरमल, माधव पंडीत, यशवंत मोकल, संदीप पाटकर यांनी अभिनंदन केले.

कबड्डी स्पर्धेत नवयुवक खिडकी संघाने मारली बाजी

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

रायगड जिल्हा व सुधागड तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने श्री वरदायिनी क्रीडा मंडळ राबगाव यांच्या वतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी नवयुवक खिडकी हा संघ ठरला आहे.

या संघास रोख रक्कम २५ हजार १ रु व आकर्षक चषक, तर द्वितीय क्रमांक म्हसोबा शहापूर या संघास रोख रक्कम १५ हजार १ रु व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक विठ्ठल कोपरपाडा संघास रोख रक्कम १० हजार १ रु व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक नवतरुण तळाघर या संघास रोख रक्कम १० हजार १ रु व आकर्षक चषक देऊन मंडळाच्या वतीने गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील मालिकावीर खेळाडू निर्देश डाके यास सायकल, तर उत्कृष्ट चढाईदार अक्षय पाटील, उत्कृष्ट पक्कड संतोष जाईलकर, पब्लिक हिरो आकाश पाटील या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

पीएनपी संकुलात रंगला पतंग महोत्सव

(छायाचित्र : अमोल नाईक)

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपी वेश्वी संकुलात कॉलेजच्या वतीने पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते पतंग उडवून महोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी विद्यार्थ्यांसोबत सहभागी होऊन पतंग उडवण्याचा आनंद घेतला. दरम्यान, समाज प्रबोधनपर संदेश लिहिलेल्या पतंगांनी आकाशात झेप घेतली.

यावेळी पीएनपी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, संचालक विक्रांत वार्डे, प्रा. रविंद्र पाटील, प्रा. दिनेश पाटील, प्रा. तेजस म्हात्रे, इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कु. यश उदय ठाकूर
मु.पो. चिरनेर,
ता. उरण, जि. रायगड
२० जानेवारी
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक
मम्मी, पप्पा,
कु. पार्थ महेश ठाकूर

भारताची न्यूझीलंडवर मात

शुभमन गिलची द्विशतकी खेळी; ब्रेसवेलची कडवी झुंज अपयशी

। नवी दिल्ली ।वृत्तसंस्था।

भारत विरुद्ध न्यूझीलंड पहिल्या एकदिवसीय सामन्यात अतिशय रोमहर्षक सामन्यात भारताने न्यूझीलंडवर मात केली. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या शुभमन गिलने वादळी द्विशतक ठोकत भारताची धावसंख्या ३४९ पर्यंत नेली. त्यानंतर ३५० धावांचं तगडं लक्ष्य न्यूझीलंडच्या मायकल ब्रेसवेलनं १४० धावांची तुफान खेळी करत जवळपास गाठलंच होतं. पण, अखेरच्या षटकात तो शार्दूल ठाकूरच्या अप्रतिम चेंडूवर पायचीत झाला आणि भारतानं सामना १२ धावांनी जिंकला.

दरम्यान, भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीपासून सलामीवीर रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी चांगली भागिदारी उभारली.

पण ३४ धावा करुन रोहित शर्मा बाद झाला. त्यानंतर त्यानंतर विराटही स्वस्तात तंबूत परतला. ईशानही दुहेरी संख्या गाठू शकला नाही. पण या एका बाजूने शुभमन मात्र टिकून खेळत होता. त्यानं शतक पूर्ण केलं, तेव्हा सूर्याने ३१ तर पांड्याने २८ धावांची साथ शुभमनला दिली. पण दोघेही बाद झाल्यावरही शुभमनने तुफान फलंदाजी करत द्वीशतक पूर्ण केलं. त्यानं १४९ चेंडूत १९ चौकार आणि ९ षटकार ठोकत २०८ धावा केल्या ज्यामुळे भारताची धावसंख्या ३४९ पर्यंत पोहोचली.

प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संघ ३५० धावाचं तगडं लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरला आणि सुरुवातीपासून त्यांचे फलंदाज बाद होऊ लागले. कॉन्वे १० धावांवर बाद झाल्यावर इतरही फलंदाज स्वस्तात बाद होत होते. फिन ॲलननं ४० धावांची चांगली खेळी केली. पण तोदेखील शार्दूल ठाकूरचा शिकार झाला. एकीकडे पटापट विकेट पडत असताना सातव्या विकेटसाठी मायकल ब्रेसवेल आणि मिचेल सँटनर यांनी एक अप्रतिम भागिदारी केली. पण सँटनर ५७ धावा करुन तंबूत परतला. दुसऱ्या बाजूने षटकार चौकार ठोकत ब्रेसवेल लक्ष्याचा पाठलाग करतच होता. पण, हार्दिक पांड्याने ४९ वी ओव्हर अप्रतिम टाकत एक विकेट घेत केवळ चार धावा दिल्या. ज्यानंतर अखेरच्या षटकात २० धावा न्यूझीलंडला हव्या होत्या. मात्र, शार्दूलनं अप्रतिम यॉर्कर टाकत ब्रेसवेललं पायचीत केलं आणि सामना भारताने १२ धावांनी जिंकला.

धावपटू बोल्टला ९८ कोटींचा चुना

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

कॅरेबियन देश जमैकाचा प्रसिद्ध खेळाडू उसेन बोल्ट आता कंगाल झाला आहे. उसेन बोल्टची १२.८ मिलियन डॉलर (सुमारे ९८ कोटी रुपये) फसवणूक झाली आहे. त्यांची आयुष्यभराची कमाई आणि निवृत्तीचे पैसे अचानक गायब झाले.

बोल्टच्या गुंतवणूक खात्यातून ९८ कोटी रुपये नाहीसे झाले. त्यांचे खाते SSL (Stocks and Securities Limited) कंपनीत होते. ही जमैकन गुंतवणूक कंपनी आहे. असोसिएटेड प्रेसने एका पत्राचा हवाला देत या प्रकरणाची माहिती दिली आहे. बोल्टच्या वकिलाने हे पत्र कंपनीला पाठवले असून, त्यात त्याचे पैसे परत करण्याची मागणी करण्यात आली आहे. बोल्टच्या खात्यात १२.८ दशलक्ष होते. त्याचे वकील लिंटन पी. गॉर्डन यांनी सांगितले की, आता बोल्टकडे फक्त १२००० डॉलर (सुमारे १० लाख रुपये) शिल्लक आहेत.

काश्मिरी हिंदू नरसंहार इंटरनेटवर ट्रेंड



। अलिबाग । वर्षा मेहता ।

विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट १९ जानेवारी रोजी थिएटरमध्ये पुन्हा प्रदर्शित झाला- हा दिवस काश्मिरी हिंदू समुदाय निर्गमन दिन म्हणून साजरा करतात. अग्निहोत्री यांनी सोशल मीडियावर ही माहिती दिली.

SOCIAL MEDIA पडसाद

घोषणा : काश्मीर फाइल्स १९ जानेवारी - काश्मिरी हिंदू नरसंहार दिनाला पुन्हा रिलीज होत आहे. वर्षातून दोनदा चित्रपट प्रदर्शित होण्याची ही पहिलीच वेळ आहे. जर तुम्ही ते मोठ्या स्क्रीनवर पाहणे चुकले असेल, तर आत्ताच तुमची तिकिटे बुक करा, अग्निहोत्री यांनी ट्विट केले.

विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित 'द कश्मीर फाईल्स'ची पुन्हा रिलीज २० जानेवारी रोजी 'सिनेमा प्रेमी दिना'च्या निमित्ताने होणार आहे. या दिवशी सर्व चित्रपटगृहांमध्ये चित्रपटाची तिकिटे फक्त ९९ रुपयांना उपलब्ध असतील. चित्रपट सध्या झी ५ या स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. या दिवशी, १९९० मध्ये, खोऱ्यातील हिंदूंच्या लक्ष्यित हत्यांचा समावेश असलेल्या इस्लामी हिंसाचारामुळे लाखो काश्मिरी हिंदूंना निर्वासित व्हावे लागले.

२२ जानेवारीला मॅरेथॉन स्पर्धा

व्यसनमुक्तीसाठी खारघर धावणार

। चिरनेर । वार्ताहर । रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २२ जानेवारी रोजी 'एक धाव व्यसनमुक्तीसाठी' हे सामाजिक हिताचे घोषवाक्य घेऊन खारघर मॅरेथॉन २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती बुधवार, दि. १८ रोजी खारघर येथे पत्रकार परिषद देण्यात आली. या स्पर्धेचे सहप्रायोजक अदिम जाती मीना विकास असोसिएशन हे आहेत.

खारघरमधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून या स्पर्धेला सकाळी सहा वाजता मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून सुरुवात होणार असून, पारितोषिक वितरण सोहळाही त्याच ठिकाणी सकाळी नऊ वाजता होणार आहे.

माजी खा. रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मॅरेथॉनला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खा. किरीट सोमय्या, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची तर प्रमुख मान्यवर म्हणून आ. महेश बालदी, अभिनेता मॉडेल निर्माता मिलिंद सोमण, बॉलीवूड हास्य अभिनेता राजपाल यादव, सिने अभिनेता व दिग्दर्शक आदिनाथ कोठारी, सिने अभिनेत्री सई मांजरेकर यांची उपस्थिती लाभणार आहे. यातील पुरुष खुला गट व महिला खुला गटासाठी शंभर, तर उर्वरित गटासाठी वीस रुपये प्रवेश फी आहे. ही प्रवेश फी सामाजिक उपक्रमासाठी वापरली जाते. शाळा व गृहसंकुल सोसायटींना प्रवेश शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले.) दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)